13 June 2026 page 01_Layout 1 6/12/2026 8:40 PM Page 1

RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

शनिवार १३ जून २०२६ | वर्ष : ६ | अंक : १६३ | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Saturday, 13 June 2026 | Year : 6 | Issue : 163 | Daily | Rate: Rs. 5/-

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत

संपर्क
ॲड . सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३९४५१

दि. 13 जून 2026



१९३३- संयुक्त समितीच्या सभासदांची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडून साक्ष तपासण्यात आली.
१९३६- दामोदर हॉल मुंबई येथे देवदासी, मुरळ्या जोगतिनी आदी स्त्रियांची परिषद डॉ. बाबासाहेबांनी घेतली.

संकलन प्रा. यशवंत दुपटे

# बंगालमध्ये सरकारी इमारतीला आग

## निवडणुकीत वापरलेले ४,००० EVM जळून खाक

**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये सत्तांतर झाल्यावर तृणमूल काँग्रेसमध्ये उभी फूट पडली. बहुतांश आमदार, खासदारांनी माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांची साथ सोडली. त्यामुळे ममता बॅनर्जी यांच्या हातून पक्षाची सुत्रं जाण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. एकीकडे राजकीय घडामोडींना वेग आलेला असताना राजधानी कोलकात्यात धक्कादायक घटना घडली आहे. अलीद्वारपूर परिसरातील एका इमारतीत आग लागून ४ हजार ईव्हीएम जळून नष्ट झाले. आग लागल्यानंतर जवळपास २४ तास अग्निशमन दलाचे कर्मचारी आग विझवत होते.

मुख्यमंत्री शुभेंदु अधिकारी यांच्या सरकारमध्ये मंत्री असलेल्या कौशिक चौधरी यांनी या घटनेबद्दल शंका उपस्थित केली. एका सरकारी इमारतीत लागलेल्या आगीत जवळपास ४ हजार ईव्हीएम जळून खाक झाली. या प्रकरणी एफआयआर नोंदवून पोलिसांनी तपास सुरू केल्याची माहिती चौधरी यांनी दिली.



बुधवारी दक्षिण कोलकात्यामधील अलीपूर परिसरातील नऊ मजली इमारतीला भीषण आग लागली होती. या इमारतीमधील अन्य विभागांसह दक्षिण २४ परगणा जिल्हा परिषदेचं कार्यालयदेखील आहे. आगीत ४ हजार ईव्हीएम नष्ट झाली आहेत. त्यांचा वापर गेल्याच महिन्यात बंगालमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये करण्यात आला होता. विधानसभेच्या १० मतदारसंघांमध्ये ही ईव्हीएम वापरली गेली होती. मागील महिन्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपने दणदणीत विजय मिळवला आहे.

### इमारत केली सील

**ही आग विजेच्या बिघाडामुळे लागली की इतर कोणत्या कारणामुळे, याचा तपास अधिकारी शोध घेत आहेत. 'आगीचे नेमके कारण अद्याप निश्चित झालेले नाही. आग अनेक मजल्यांवर कशी पसरली याचा तपास अधिकारी करत असल्याने, इमारत सील करण्यात आली असून आत-बाहेर जाण्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत.' पोलिसांनी इमारतीच्या आजूबाजूला पाळतही वाढवली आहे.**

मंत्री कौशिक चौधरी यांनी आगीबद्दल संशय व्यक्त केला.



'आगीची घटना सामान्य वाटत नाही. यामागे कट होता का याचा तपास सुरू आहे. आग नवव्या, दहाव्या मजल्यापर्यंत कशी पोहोचली, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. या सगळ्या प्रकरणाचा तपास सुरू आहे,' असे चौधरी यांनी सांगितले. आधी इमारतीच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्याला लागलेली होती. मग मधल्या मजले सुरक्षित राहिले आणि आगीने थेट नवव्या आणि दहाव्या मजल्यांना आपल्या कवेत घेतले. त्यामुळे यामागे कट कारस्थान आहे का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. फॉरेन्सिकचा अहवाल आल्यावरच अनेक गोष्टी स्पष्ट होतील. त्यामुळे आपण अहवालाची प्रतीक्षा करु, असं चौधरी यांनी म्हटले.

# परीक्षा पेपर लीक प्रकरणी धरमेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी

## कॉकरोच जनता पार्टी'चे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात शांततापूर्ण आंदोलन

**पुणे :** कॉक्रोच जनता पार्टीचे पुणे विद्यापीठात अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वात आंदोलन झाले. या आंदोलनात केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची प्रमुख मागणी करण्यात आली. तसेच आंदोलनात सोनम वांगचुक यांची उपस्थित असल्याने आंदोलनाचे महत्त्व अधिक वाढले आहे. CBSE, CUET आणि SSC GD सारख्या महत्त्वाच्या परीक्षांमधील पेपर लीक आणि गैरप्रकारांमुळे लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात सापडल्याच्या निषेधार्थ 'कॉकरोच जनता पार्टी'च्या वतीने पुण्यात मोठे शांततापूर्ण आंदोलन करण्यात आले. यात एक कोटीहून अधिक विद्यार्थ्यांना बाधित झाल्याचा दावा करण्यात आला.

आंदोलनकर्त्यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली. 'उत्तरदायित्व द्या, न्याय द्या, धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा द्या' अशा घोषणा देण्यात आल्या. प्रदर्शनात विद्यार्थी, डॉक्टर्स, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक हजारोंच्या मोठ्या संख्येने उपस्थित होते. अभिजीत दीपके यांनी या आंदोलनाचे नेतृत्व करताना थेट केंद्रीय शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आणि देशातील तरुणांच्या भविष्याबाबत प्रश्न उपस्थित केले, 'आम्ही किती काळ भीतीच्या छायेत जगणार?' असा सवाल करत त्यांनी सरकारी यंत्रणेच्या कारभारावर तीव्र टीका केली. त्यांनी सांगितले की, परीक्षांमधील पेपर लीक, निकालांमधील अनियंत्रितता आणि वेळेवर निकाल न लागणे यामुळे करोडो तरुणांचे भविष्य अंधारात ढकलले गेले आहे. त्यांनी पुण्यात आंदोलनादरम्यान एक 'शिक्षण जाहीरनामा' (Education Manifesto) जारी केला. या जाहीरनाम्यात पेपर लीक रोखण्यासाठी कडक कायदे करणे, भरती परीक्षांमध्ये पारदर्शकता आणणे आणि परीक्षा घेणाऱ्या संस्थांची जबाबदारी निश्चित करणे या मागण्यांचा समावेश होता. समाजसेवक सोनम वांगचूक आपल्या भाषणात म्हणाले, लडाखचे प्रसिद्ध कार्यकर्ते सोनम वांगचूक यांनी या तरुण आणि विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला आणि स्वतःला 'ऑनरी कॉकरोच' (मानद कॉकरोच) म्हणवून घेतले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विचारपीठावरून बोलताना ते म्हणाले, 'हा केवळ विरोध (Protest) नसून एक 'आग्रह' आहे. मी याला विरोध प्रदर्शन म्हणणार नाही, तर हा यंत्रणेकडे केलेला एक 'आग्रह' आहे. विद्यार्थी काही चंद्र-सूर्य मागत नाहीयेत, तर ते फक्त परीक्षांमध्ये आणि सिस्टीममध्ये प्रामाणिकपणा मागत आहेत.' यंत्रणेत बदल कधी होईल? वांगचूक यांनी एक महत्त्वाचा मुद्दा मांडला की, 'देशातील शिक्षण व्यवस्थेत आणि सरकारी शाळांमध्ये तोपर्यंत खरा बदल होणार नाही, जोपर्यंत देशाचे धोरण ठरवणाऱ्या नेत्यांची आणि खासदारांची मुले सुद्धा त्याच शाळांमध्ये शिकणार नाहीत, जिथे सामान्य जनतेची मुले शिकतात.'



शांततेचे आवाहन आणि इशारा : आंदोलन वेळी त्यांनी संदेशाद्वारे आवाहन केले की, आंदोलन पूर्णपणे शांततापूर्ण मार्गाने व्हावे. आंदोलनात कोणीही दगड किंवा लाठ्या वापरू नयेत. तसेच, जर सरकारने अभिजीत दीपके किंवा इतर कार्यकर्त्यांना अटक केली, तर ते ४२ दिवसांचे लाक्षणिक उपोषण करतील, असा इशाराही त्यांनी दिला. त्यांनी तरुणांना आवाहन केले की, ही केवळ एका आंदोलनाची सुरुवात आहे, अंत नाही. शिक्षणानंतर पाणी, पर्यावरण आणि देशातील इतर महत्त्वाच्या मुद्द्यांवरही तरुणांनी एकत्र येऊन आवाज उठवला पाहिजे.

# महत्वाच्या बातम्या

## केरळमध्ये महिलांसाठी मोफत बस प्रवास

**तिरुवनंतपुरम :** केरळ सरकारने महिलांसाठी बस प्रवास मोफत करण्याचा एक मोठा निर्णय घेतला आहे. ही सुविधा १५ जूनपासून राज्यभरातील केएसआरटीसीच्या (KSRTC) सामान्य बसेसमध्ये उपलब्ध होईल. परिवहन मंत्री सी. पी. जॉन यांनी सांगितले की, या मोफत प्रवासाचा लाभ घेण्यासाठी महिलांना कोणत्याही विशेष कार्ड किंवा प्रमाणपत्राची आवश्यकता भासणार नाही. मुख्यमंत्री व्ही. डी. सतीशन १५ जून रोजी सकाळी ८:३० वाजता थंपानूर बस स्थानकावर या योजनेचे उद्घाटन करतील. उद्घाटनाच्या वेळी, सर्व बस चालक आणि देखभालीची कामे महिला कर्मचाऱ्यांकडून हाताळली जातील. सध्या, केएसआरटीसीकडे ३,१२५ सामान्य बसेस आहेत. एकट्या तिरुवनंतपुरममध्ये अशा ६८७ बसेस आहेत. ग्रामीण भागातील 'ग्रामवंडी' सेवेमध्येही महिलांना मोफत प्रवास करता येणार आहे. या ग्रामीण बसेसची संख्या ५८ वरून ५०० पर्यंत वाढवण्याची सरकारची योजना आहे.

## मुख्यमंत्री विजय यांची शेतकऱ्यांसाठी १३४.८३ कोटी रुपयांच्या विशेष पॅकेजची घोषणा

**चेन्नई :** तामिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांनी राज्यात भातशेतीला प्रोत्साहन देण्यासाठी 'कुरुवाई विशेष पॅकेज योजना २०२६' जाहीर केली आहे. या योजनेवर १३४.८३ कोटी रुपये खर्च केले जातील. कावेरी डेल्टा आणि डेल्टा-बाहेरील दोन्ही भागांतील शेतकऱ्यांना याचा फायदा होईल. राज्यातील अन्नसुरक्षा आणि शेतकऱ्यांच्या उपजीविकेसाठी भातशेती अत्यंत महत्त्वाची आहे. तामिळनाडूमध्ये दरवर्षी अंदाजे ५२,७२,००० एकर क्षेत्रावर भातशेती केली जाते. तंजावर, तिरुवरूर आणि नागपट्टिनम यांसारख्या डेल्टा जिल्ह्यांमध्ये २०,६५,००० एकर, तर डेल्टा-बाहेरील जिल्ह्यांमध्ये ३२,०७,००० एकर क्षेत्रावर भातशेती केली जाते. कुरुवाई हंगामात सरासरी ५१,४०,००० एकर क्षेत्रावर भाताची पेरणी केली जाते. या पॅकेजद्वारे उत्पन्न आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, हे मुख्यमंत्र्यांचे उद्दिष्ट आहे. शेतीसोबतच, मुख्यमंत्र्यांनी महिलांच्या सुरक्षेसाठी 'सिंगापेन विशेष दल' देखील सुरू केले आहे. राज्यातील प्रत्येक कुटुंबाची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे, असे मुख्यमंत्री विजय म्हणाले. त्यांनी याला केवळ निवडणुकीचे आश्वासन नसून आपल्या सरकारची एक मोठी जबाबदारी असल्याचे म्हटले.

# होर्मुझची सामुद्रधुनी खुली होणार

**नवी दिल्ली :** मागील काही महिन्यांपासून अमेरिका आणि इराणमध्ये तणाव सुरू आहे. होर्मुझचही बंद असल्यामुळे याचा परिणाम जागतिक व्यापारावर झाला आहे. दरम्यान, आता एक मोठी माहिती समोर आली आहे. होर्मुझ पुन्हा सुरू आहे. अमेरिका आणि इराणमध्ये करार झाल्याचे समोर आले आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील प्रस्तावित शांतता कराराच्या अटी उघड झाल्या आहेत. इराणच्या निम-सरकारी मेहर वृत्तसंस्थेनुसार, या मसुदा करारामध्ये १४ महत्त्वाचे मुद्दे आहेत. त्यातील पहिला मुद्दा म्हणजे लेबनॉनमधील सुरू असलेल्या संघर्षासह सर्व आघाड्यांवरील शत्रुत्व तात्काळ आणि कायमस्वरूपी संपुष्टात आणणे आहे.

या करारानुसार, होर्मुझची सामुद्रधुनी ३० दिवसांच्या आत पुन्हा उघडण्याचा प्रस्ताव आहे, मात्र तिचे कामकाज इराणच्या देखरेखीखाली असणार आहे. मसुद्यानुसार, अमेरिका इराणच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करणार नाही आणि त्याच्या सार्वभौमत्वाचा आदर करेल. इतकेच नव्हे तर, अमेरिकेला ३० दिवसांच्या आत नौदल नाकेबंदी उठवावी लागेल आणि इराणच्या आसपासची आपली लष्करी उपस्थिती कमी करावी लागेल.

या अटींना इराण किंवा अमेरिकेकडून अद्याप अधिकृतपणे दुजोरा मिळालेला नाही. अहवालानुसार, कराराचा मसुदा अद्याप अंतिम



झालेला नाही आणि तो इराणच्या सर्वोच्च नेतृत्वाच्या मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे.

इराणच्या तेलावरील अमेरिकेचे निर्बंध हटवण्याबाबत किंवा स्थगित करण्याबाबतही चर्चा सुरू आहे. अमेरिका आणि तिच्या मित्र राष्ट्रांना इराणच्या पुनर्बांधणीसाठी किमान ३०० अब्ज डॉलर्सची योजना तयार करावी लागेल. अणुकार्यक्रमाशी संबंधित मुद्द्यांवर आणि सर्व आर्थिक निर्बंध हटवण्याबाबत अंतिम करार करण्यासाठी दोन्ही देश ६० दिवसांची वाटाघाटी देखील करतील. या मसुद्यात, इराणने पुन्हा एकदा अण्वस्त्रे विकसित न करण्याचे करार केला आहे. त्या बदल्यात, अमेरिका वाटाघाटींदरम्यान या प्रदेशात आपली लष्करी उपस्थिती वाढवणार नाही आणि इराणवर कोणतेही नवीन निर्बंध लादणार नाही. या करारामध्ये इराणचा गोठवलेला २४ अब्ज डॉलर्सचा निधी मुक्त करण्याचाही प्रस्ताव आहे. कराराच्या पालनावर देखरेख ठेवण्यासाठी एक विशेष यंत्रणा स्थापन केली जाईल.

# ईडीने १,४०० कोटी रुपयांचा बँक घोटाळा व ६० कोटी रुपयांची मालमत्ता केली जप्त



**नवी दिल्ली :** १,४०० कोटी रुपयांच्या एसकेएनएल बँक घोटाळा प्रकरणी अंमलबारी संचालनालयाने (ईडी) महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील मुरुड येथे, अलिबागजवळ अरबी समुद्राला लागून असलेली ६० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीची मालमत्ता जप्त केली आहे. यापूर्वी, तपास यंत्रणेने लंडनमधील बकिंगहॅम पॅलेसजवळ असलेली, अंदाजे ११९.५५ कोटी रुपये किमतीची एक आलिशान मालमत्ता तात्पुरती जप्त केली होती. ईडीच्या म्हणण्यानुसार, मेसर्स एस कुमार नेशनवाइड लिमिटेड (एसकेएनएल) चे माजी अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक नितीन शंभू कुमार कासलीवाल यांनी, ज्यावेळी एसकेएनएलने बँकांच्या समूहाकडून मोठ्या प्रमाणात कर्ज सुविधा घेतल्या होत्या, त्या वेळी निधीची अफरातफर आणि स्तरीकरण करण्यासाठी स्वतःच्या आणि कुटुंबातील सदस्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या समूह कंपन्या आणि कंपन्यांच्या नेटवर्कचा वापर केला. एसकेएनएलमधून वळवलेला निधी अखेरीस रायगड जिल्ह्यातील मुरुड येथे अलिबागजवळ अरबी समुद्राच्या काठावरील एक मालमत्ता खरेदी करण्यासाठी वापरण्यात आला. १,४०० कोटी रुपयांच्या एसकेएनएल बँक घोटाळा प्रकरणाच्या सुरू असलेल्या तपासात असे आढळून आले आहे की, ही मालमत्ता थेट गुन्हेगारीतून मिळालेल्या पैशातून खरेदी करण्यात आली होती. ईडीच्या तपासात असे उघड झाले आहे की, विविध बँकांकडून एसकेएनएलला वितरित केलेला कर्जाचा निधी नितीन कासलीवाल यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या संबंधित कंपन्यांच्या नेटवर्कद्वारे कथितरित्या वळवण्यात आला होता. यापूर्वी, तपास यंत्रणेने २३ डिसेंबर २०२५ रोजी पीएमएलए, २००२ च्या कलम १७ अंतर्गत शोधमोहीम राबवली होती.




# नीती आयोगातील कंत्राटी भरतीविरोधात 'आसरा' आक्रमक

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारचा मुख्य विचारगट (थिंक टँक) असलेल्या 'नीती आयोग' आणि इतर विविध सरकारी विभागांमध्ये वाढत्या कंत्राटी पद्धतीवर आणि निवृत्त कर्मचाऱ्यांच्या पुनर्नियुक्तीवर 'असोसिएशन ऑफ सोशल अँड आरटीआय ॲक्टिव्हिस्ट्स' या संस्थेने तीव्र आक्षेप घेतला आहे. या कंत्राटी संस्कृतीला तात्काळ आळा घालून देशातील सुशिक्षित तरुणांना कायमस्वरूपी नोकरीच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करणारी एक जाहीर तक्रार 'आसरा' संस्थेने थेट प्रधानमंत्री कार्यालयाकडे पाठवली आहे. माहिती अधिकारात धक्कादायक वास्तव समोर : 'आसरा' संस्थेने आपल्या तक्रारीत एका माहिती अधिकारातून मिळालेल्या पत्राचा दाखला दिला आहे. ४ जून २०२६ रोजी नीती आयोगाने दिलेल्या अधिकृत माहितीनुसार, ३ जून २०२६ पर्यंत एकट्या नीती आयोगात १४२ सल्लागार आणि १५६ यंग प्रोफेशनल्स कंत्राटी तत्त्वावर कार्यरत आहेत. आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार ही कंत्राटी पदे तब्बल ४५० पर्यंत वाढवण्याची मुभा आहे. धक्कादायक बाब म्हणजे, हे २९८ कर्मचारी नियमित कर्मचारी म्हणून वर्गीकृत नसून ते पूर्णपणे कंत्राटी पद्धतीवर काम करत आहेत.




तरुणांच्या भविष्यावर गदा; 'आसरा'चा आरोप : प्रधानमंत्री यांना पाठवलेल्या निवेदनात 'आसरा'ने म्हटले आहे की, नीती आयोगासारख्या सर्वोच्च धोरणात्मक संस्थेतच जर एवढ्या मोठ्या प्रमाणावर कंत्राटीकरण होत असेल, तर तो देशातील इतर विभागांसाठी एक वाईट पायंडा ठरेल. लाखो तरुण वर्षानुवर्षे स्पर्धा परीक्षांची तयारी करत असताना, नियमित पदे कंत्राटी पद्धतीने भरणे आणि निवृत्त अधिकाऱ्यांना पुन्हा कंत्राटावर घेऊन वरिष्ठ पदे अडवून ठेवणे, हा देशातील तरुण पिढीवर घोर अन्याय आहे. यामुळे तरुणांच्या हक्काच्या रोजगाराच्या संधी हिरावल्या जात आहेत.









“ विज्ञानाची कास धरल्याशिवाय देशाची व समाजाची प्रगती अशक्य आहे... ”



## संपादकीय

# लोकशाहीची खरी परीक्षा

मध्य प्रदेश आणि गुजरातमधील अलीकडील राज्यसभा निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाने सर्व जागांवर विजय मिळविल्यानंतर देशातील राजकीय समीकरणांवर पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. या निकालांमुळे भाजपची संघटनात्मक ताकद, निवडणूक व्यवस्थापन आणि राजकीय रणनीती पुन्हा अधोरेखित झाली. दुसरीकडे, काँग्रेससह विरोधी पक्षांसमोर आत्मपरीक्षणाचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. केवळ भाजपविरोधी भूमिका घेऊन निवडणुका जिंकता येत नाहीत, तर जनतेसमोर विश्वासार्ह पर्याय उभा करणे आवश्यक आहे. मध्य प्रदेशातील श्रीमती जयंती नटराजन यांच्या उमेदवारी अर्जाच्या संदर्भात निर्माण झालेला वादही या पार्श्वभूमीवर महत्त्वाचा ठरतो. काँग्रेसचा आरोप असा आहे की त्यांच्या उमेदवारीवर कथित फौजदारी प्रकरणाची माहिती न दिल्याच्या कारणावरून आक्षेप घेण्यात आला, तर पक्षाचा दावा आहे की त्यांच्याविरुद्ध असे कोणतेही प्रकरण अस्तित्वात नव्हते. या प्रकरणामुळे निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता, निष्पक्षता आणि घटनात्मक संस्थांवरील जनतेचा विश्वास या विषयांवर प्रश्न उपस्थित झाले. अशा वादांमध्ये अंतिम सत्य न्यायालयीन किंवा संबंधित घटनात्मक प्रक्रियेतून स्पष्ट होणे आवश्यक असते. लोकशाहीत प्रत्येक निर्णय कायद्याच्या कसोटीवर टिकला पाहिजे. आज काँग्रेसपुढील सर्वात मोठा प्रश्न असा आहे की भाजपच्या मजबूत संघटनात्मक यंत्रणेला उत्तर कसे द्यायचे? त्यासाठी केवळ पत्रकार परिषद, आंदोलने किंवा सोशल मीडियावरील प्रचार पुरेसा ठरणार नाही. गावागावात, वॉर्डनिहाय आणि बूथस्तरावर पक्षाची पुनर्बांधणी करणे ही काळाची गरज आहे. कार्यकर्त्यांचे सातत्याने प्रशिक्षण, युवक आणि महिलांना नेतृत्वाच्या संधी, स्थानिक प्रश्नांवर जनआंदोलने आणि लोकांशी सातत्यपूर्ण संपर्क यांवर भर देणे आवश्यक आहे. भाजपशासित राज्यांमध्ये काँग्रेसने केवळ सरकारवर टीका करण्यापेक्षा पर्यायी विकासाचा आराखडा जनतेसमोर मांडला पाहिजे. बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यांचे प्रश्न, शिक्षण, आरोग्य, महिला सुरक्षा, उद्योगधंदे, पर्यावरण आणि सामाजिक न्याय या विषयांवर व्यापक जनसंवाद घडवून आणणे गरजेचे आहे. प्रत्येक जिल्ह्यात संविधान जनजागृती अभियान, युवक संवाद, महिला परिषद, शेतकरी मेळावे, रोजगार मार्गदर्शन शिबिरे, कायदेविषयक मदत केंद्रे आणि सामाजिक समन्वय कार्यक्रम राबविले तर पक्षाची सामाजिक उपस्थिती वाढू शकते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकशाही टिकवण्यासाठी घटनात्मक नैतिकतेवर भर दिला होता. निवडणुका जिंकणे हा लोकशाहीचा शेवट नसून सुरुवात आहे. सत्ताधारी आणि विरोधक या दोघांनीही संविधान, कायद्याचे राज्य, उत्तरदायित्व आणि पारदर्शकता यांचा आदर केला पाहिजे. विरोधी पक्षाची भूमिका ही केवळ विरोध करण्यापुरती मर्यादित नसून पर्यायी धोरणे आणि विधायक सूचना देण्याचीही असते. महाराष्ट्रातील राजकीय परिस्थितीही तितकीच गुंतागुंतीची आहे. गेल्या काही वर्षांत पक्षफुटी, आघाड्या, युती, नेतृत्वातील बदल आणि वारंवार बदलणारी राजकीय समीकरणे यांमुळे मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. पक्षनिष्ठेपेक्षा सत्तेची गणिते अधिक महत्त्वाची ठरत असल्याची भावना अनेक नागरिक व्यक्त करतात. त्यामुळे मतदारांचा विश्वास पुन्हा संपादन करणे हे सर्वच पक्षांसमोरचे मोठे आव्हान आहे. काँग्रेसने महाराष्ट्रात संघटनात्मक पुनर्बांधणीवर भर देणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, शहरातील मध्यमवर्ग, तरुण, महिला, कामगार, अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्गीय आणि अल्पसंख्याक समाज यांच्याशी सातत्यपूर्ण संवाद वाढवून स्थानिक नेतृत्वाला संधी दिली पाहिजे. निवडणुकीच्या काही महिन्यांपूर्वी नव्हे, तर वर्षभर लोकांमध्ये राहणारी संघटना उभी करावी लागेल. आजच्या काळात डिजिटल माध्यमेही अत्यंत प्रभावी ठरली आहेत. माहितीचा वेग, अफवा आणि प्रचार यामुळे मतदारांवर परिणाम होतो. त्यामुळे तथ्याधारित माहिती, प्रभावी संवाद आणि त्वरित जनसंपर्क यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर प्रत्यक्ष भेटी, पदयात्रा, जनसंवाद आणि स्थानिक प्रश्नांवरील लोकआंदोलने यांना पर्याय नाही. लोकशाहीत अंतिम निर्णय मतदार देत असतो. कोणताही पक्ष कायमस्वरूपी विजयी किंवा पराभूत राहत नाही. जनतेच्या अपेक्षा पूर्ण करणारा, विश्वासार्ह नेतृत्व देणारा आणि विकासाबरोबर सामाजिक न्यायाचा कार्यक्रम राबविणारा पक्षच दीर्घकाळ लोकांचा विश्वास संपादन करू शकतो. आज देशाला संघर्षापेक्षा संवादाची, आरोप-प्रत्यारोपांपेक्षा उत्तरदायित्वाची आणि राजकीय ध्रुवीकरणापेक्षा संविधाननिष्ठ लोकशाहीची आवश्यकता आहे. सत्ताधारी पक्षानेही टीकेला सकारात्मकपणे स्वीकारून पारदर्शक प्रशासन द्यावे, तर विरोधी पक्षांनी केवळ सत्ताविरोधी राजकारण न करता पर्यायी राष्ट्रीय दृष्टीकोन मांडावा. हीच भारतीय लोकशाहीची खरी ताकद आहे. मध्य प्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्रातील अलीकडील राजकीय घडामोडी एक स्पष्ट संदेश देतात. लोकशाहीमध्ये संघटना, विश्वास, सातत्यपूर्ण जनसंपर्क आणि लोकहिताचे धोरण यांना पर्याय नाही. मतदार आता अधिक जागरूक झाला आहे. त्यामुळे प्रत्येक पक्षाने संविधानाच्या मूल्यांचा आदर करत लोककल्याणाला सर्वोच्च प्राधान्य दिल्यास भारतीय लोकशाही अधिक सक्षम आणि परिपक्व होईल.●●

# जनगणना, जात आणि बौद्ध समाजातील दोन प्रवाह

**भारतामध्ये जनगणना ही केवळ लोकसंख्येची मोजणी नसून, सामाजिकआर्थिक विषमता, ऐतिहासिक अन्यायाची मोजणी आणि त्याच्या परीमार्जीनासाठी नव्या धोरणनिर्मितीचे प्रतिबिंब दाखवणारी एक महत्त्वाची प्रक्रिया आहे. विशेषतः अनुसूचित जाती (SC) व अनु.जमाती (ST) प्रवर्गातील समाजासाठी जनगणनेतील “जात” हा रकाना ऐतिहासिकदृष्ट्या संवेदनशील आहे.**

आज अनुसूचित जाती प्रवर्गातील बौद्ध समाजासाठी “जात” हा रकाना हाराकिरीचा बनला आहे. बौद्ध समाजात या रकान्याबाबत दोन वेगवेगळे मतप्रवाह दिसत आहेत. त्यापैकी एक प्रवाह धर्मांतरापूर्वीची जात लिहिण्याचा आग्रह करतो तर दुसरा जात रकाना रिकामा ठेवण्याचा आग्रह करतोय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातविरहित समाजाची निर्मिती हे अंतिम ध्येय मानले होते. त्यांनी जातीव्यवस्थेला भारतीय समाजातील सर्वात मोठा सामाजिक रोग म्हटले होते. परंतु त्याचवेळी त्यांनी दलितांच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी आरक्षणाची गरज स्पष्टपणे मांडली. यामुळे लवकरच सुरु होणाऱ्या जनगणनेत “जात लिहावी कि नाही लिहावी?” हा प्रश्न तत्त्वज्ञान आणि वास्तव यांच्या संघर्षातून उभा राहिला आहे.

**जनगणनेच्या रकान्यात जात लिहा म्हणणारा प्रवाह :** जात लिहा म्हणणाऱ्या प्रवाहानुसार, आजही बौद्ध समाजात मोठ्या प्रमाणात गरिबी पसरली आहे, तो शिक्षणात मागे असून त्याचे नोकरीतील प्रतिनिधित्व कमी आहे. त्यांना आजही सामाजिक भेदभावाचा सामना करावा लागत असून अनेक आर्थिक संधीपासून तो वंचित आहे. या परिस्थितीत आरक्षण हे बौद्ध समाजासाठी केवळ हक्क नाही, तर उन्नतीचे साधन आहे. आरक्षणाशिवाय गरीब बौद्ध समाजाला शिक्षण, नोकरी, सन्मान आणि आर्थिक उन्नती मिळणे कठीण आहे. डॉ. बाबासाहेबांनी “धर्मांतरानंतर आरक्षण सोडा” असे कधीही म्हटले नाही. उलट त्यांनी “तुमचे आरक्षण माझ्या खिशात आहे.” असे म्हटले होते. म्हणून आरक्षण हा आंबेडकरी चळवळीचा मूलभूत घटक आहे. या प्रवाहानुसार अनु.जातीच्या भविष्यातील विकासासाठी (शिष्यवृत्ती, शैक्षणिक सवलती, नोकरीतील आरक्षण व आर्थिक योजना) संशोधन, धोरणनिर्मिती आणि न्यायहक्कासाठी डेटा आवश्यक आहे. जनगणनेतील जातीय आकडेवारीमुळे समूहाच्या सामाजिक आर्थिक मागासलेपणाचे मोजमाप शक्य होते. बौद्ध धर्म स्वीकारल्याने सन्मान, स्वाभिमानाची व सत्यता ओळखण्याची शिकवण मिळाली, पण आर्थिक उन्नतीसाठी अजूनही संघर्ष आहे. धर्मांतरपूर्वीचा बौद्ध समाज हा भूमिहीन, मजूर व साधनहीन होता. म्हणून त्याला इतराच्या बरोबरीने येण्यासाठी आरक्षणाची गरज असल्यामुळे त्याने जणगणनेतील जाती रकान्यात “पूर्वीची जात” लिहिणे व्यावहारिकदृष्ट्या फायदेशीर ठरते असे या प्रवाहाचे म्हणणे आहे.



**जातीचा रकाना रिकामा ठेवा म्हणणारा प्रवाह :** दुसरीकडे जातीच्या रकान्यात जात लिहिण्याचे अनेक नकारात्मक मुद्दे आहेत, दुसरा प्रवाह हे मुद्दे हिरहिरीने मांडताना दिसताहेत. ते म्हणतात कि, डॉ. बाबासाहेबांनी जातव्यवस्थेला भारतीय समाजातील सर्वात मोठा सामाजिक रोग म्हटले होते. त्यांनी जातीयतेला समानता विरोधी, लोकशाहीला बाधक व मानवी प्रतिष्ठेचा नाश करणारी व्यवस्था समजून धर्मांतराचा मार्ग स्वीकारला आणि बौद्ध धर्माची निवड केली, कारण बौद्ध धर्म हा जातविरहित, समतावादी आणि मानवतावादी आहे. म्हणूनच तत्त्वतः बौद्ध समाजाने जनगणनेत जात लिहिणे हे आंबेडकरी विचारांच्या विरोधात आहे असे हा प्रवाह म्हणतो. जातीच्या रकान्यात जात लिहिल्यामुळे बौद्ध धर्माच्या मूलभूत मूल्यांनाच विरोध होतो. कारण बुद्धांनी जातव्यवस्था नाकारली होती. म्हणून जात लिहिणे किंवा जातीचा अंगीकार करणे हे बौद्ध धर्माच्या तत्वाविरोधी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातमुक्तीच्या लढ्यासाठी धर्मांतर केले, त्यामुळे जात लिहिल्याने त्यांच्या धर्मांतराच्या उद्देशाला धक्का पोहोचतो. हा मतप्रवाह बौद्ध धर्माच्या तत्त्वांशी सुसंगत अशी भूमिका घेतो. कारण बौद्ध धर्मात जात नाही. त्यामुळे जात न लिहिणे म्हणजे बौद्ध धर्माची खरी ओळख जपणे होय. जातिची नोंद न केल्याने पुढील पिढ्यांमध्ये जातीय ओळख कमी होऊन जातमुक्त समाजाच्या दिशेने प्रत्यक्ष पाऊल टाकण्याची सुरुवात होईल असे हा प्रवाह म्हणतो.

**प्रवाह दोन, उद्देश एक :** जाती नोंदणीबाबत दोन्ही प्रवाहांचे मत व त्यांचे तत्त्वज्ञान वेगळे असले तरी त्यांचा उद्देश मात्र एकच दिसतो. समाजाची आर्थिक व शैक्षणिक उन्नती, सन्मान आणि जातिमुक्त समाजाची निर्मिती करणे हे दोन्ही प्रवाहाचे उद्दिष्ट दिसतेय. एक प्रवाह व्यावहारिक हक्क, आरक्षण आणि समान न्याय यावर भर देतो. तर दुसरा प्रवाह धर्म, त्याचे तत्त्वज्ञान आणि जातमुक्त समाज या मूल्यांवर भर देतो. या दोन्ही प्रवाहांमध्ये संघर्ष नसून, ही एक सामाजिक परिचर्चा आहे. अशा प्रकारची चर्चा होत राहणे हि प्रगतीची पहिली पायरी समजली पाहिजे. परंतु दोन्ही प्रवाहानी हे गृहीतक स्पष्ट जाणले पाहिजे कि,

बापू राऊत
मो. ९२२४३४३४६४

भारतासारख्या देशात जात लिहिली किंवा नाही लिहिली तरी या देशातून जात हद्दपार होणे नाही. कारण जातीव्यवस्था भारतीय समाजात खूप खोलवर रुजली आहे आणि जातव्यवस्था तशीच कायम राहावी यासाठी काही सनातनवादी संस्था कार्यरत आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अंतिम ध्येय जातीविरहित समाज निर्मिती हे असले तरी त्याहून मोठे वास्तव समाजाची उन्नती करणे होते. जात नष्ट करण्यासाठी प्रथम अनुसूचित जाती समूहाला शिक्षित, संघटित आणि सशक्त करणे आवश्यक आहे. आरक्षण हे जात टिकवण्यासाठी नव्हे, तर जात नष्ट करण्यासाठी अनुसूचित जातींना सक्षम बनवण्याचा तो संरक्षणात्मक कार्यक्रम आहे, या दृष्टीकोनातून जात व आरक्षणाकडे बघितले पाहिजे. आजचा प्रश्न हा “जात लिहिणे योग्य की अयोग्य?” हा नसून “बौद्धासाहित अनुसूचित जातीसमुह जातविरहित समाज निर्माण करण्याइतका सक्षम झाला आहे का?” हा आहे आणि याचे उत्तर “नाही” असेच आहे. म्हणून आज तत्त्ववादापेक्षा व्यावहारिकता महत्त्वाची ठरते. आंबेडकरी विचारसरणीही याच दिशेने मार्गदर्शन करते हे लक्षात घेतले पाहिजे.

जात जनगणनेतील संभ्रम हा केवळ धार्मिक किंवा तत्त्ववादी प्रश्न नाही. तो राजकीय शक्तीच्या विघटनाशी थेट जोडलेला आहे. याचा परिणाम म्हणून बौद्धासहित अनु.जातीचे एकसंघ नेतृत्व, एकसंघ मत, एकसंघ भूमिका व एकसंघ मागणीही निर्माण (तयार) होत नाही. त्यामुळेच जातीच्या रकान्यात जात लिहावी की नाही हा प्रश्नही गटबाजी, राजनीती आणि नेतृत्वाच्या रिकाम्या पोकळीत अडकून पडतोय. आज जाती जनगणनेच्या प्रश्नावरही राजकीय नेते नेहमीप्रमाणे मौन आहेत. हे मौनव्रत अपघाती नाही, तर ती सामाजिक व राजकीय संरचनेतील खोलवरच्या समस्यांचे लक्षण आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले होते, ‘मत (व्होट) हे तुमचे शस्त्र आहे, याचा वापर समस्याचे निराकरण करण्यासाठी केला पाहिजे.’ जणगणनेतील जाती प्रश्नाची उकल यात दडलेली आहे. अस्पष्ट दिशेमुळे जात जणगणनेचा प्रश्नही तुकड्यातच चर्चिला जात आहे. एकीकडे बौद्ध धर्म जात नाकारतो आणि दुसरीकडे आंबेडकरी तत्त्वज्ञान जातविरहित समाजाचे स्वप्न दाखवते. परंतु दलित समाज अजूनही आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागे असल्याने संरक्षणात्मक उपाय म्हणून आरक्षण अत्यावश्यक आहे. जाती रकान्यात जात लिहिणे तत्त्वतः विरोधाभासी असले तरी, आजच्या वास्तवात ते बौद्ध व अनु.जाती समाजाच्या उन्नतीसाठी आवश्यक आहे. जात नष्ट करण्यासाठी प्रथम दलित समाज सक्षम होणे गरजेचे आहे आणि त्या सक्षमतेसाठी आरक्षण आणि जातीय डेटा दोन्ही आवश्यक आहेत. कधी कधी तत्त्ववादापेक्षा व्यावहारिकता महत्त्वाची ठरते. आर्थिक सक्षमता प्राप्त झाल्याच्या निर्णयक्षमतेपर्यंत पोहोचल्याची जाणीव झाली कि मग जातीचा झु फेकून देता येवू शकतो.●●

# परिवर्तनाच्या दाव्यांमध्ये हरवलेला सामान्य नागरिक

एकता, विश्वास, विकास आणि सार्वजनिक सहभाग हे शब्द ऐकायला कितीही आकर्षक वाटत असले, तरी आज सामान्य नागरिकांना ते त्यांच्या वास्तवापासून दूर असल्याचे जाणवू लागले आहे. देश परिवर्तनाच्या नव्या युगात प्रवेश करत असल्याचा दावा सातत्याने केला जातो. गेल्या १२ वर्षांच्या प्रवासाला “विश्वास, विकास, सुशासन आणि जनकल्याण यांचा अभूतपूर्व संगम” असे संबोधले जाते. परंतु रस्त्यावरचा सामान्य माणूस एक मूलभूत प्रश्न विचारत आहे, हा विकास नेमका कोणासाठी आहे? आज देशात भव्य प्रकल्प, नवीन महामार्ग, मेट्रो, डिजिटल तंत्रज्ञान आणि आधुनिक पायाभूत सुविधांवर सातत्याने चर्चा होत आहे. परंतु दुसरीकडे, सामान्य माणसाचा दैनंदिन जीवनासाठीचा संघर्ष अधिक कठीण होत चालला आहे. त्यामुळे अनेकांच्या दृष्टीने “विकास” हा शब्द केवळ घोषणांपुरता मर्यादित राहिल्याची भावना निर्माण होत आहे. महागाईने मोडली कंबर, गॅस सिलिंडर, पेट्रोल, डिझेल, धान्य, भाजीपाला, शिक्षण आणि आरोग्य सेवांवरील वाढत्या खर्चामुळे सामान्य कुटुंबाचे आर्थिक गणित कोलमडले आहे. सरकार विकासाच्या आकडेवारीवर भर देते, परंतु नागरिकांच्या स्वयंपाकघरातील वास्तव वेगळेच चित्र दाखवते. शहरी मध्यमवर्ग असो किंवा ग्रामीण गरीब, खर्चाचा ताण सातत्याने वाढताना दिसत आहे. जनमानसात एक प्रश्न उपस्थित होतो, जर विकास एवढा व्यापक झाला असेल, तर सामान्य माणसाचे आर्थिक आयुष्य अधिक सुरक्षित का वाटत नाही? बचत का कमी झाली आहे? रोजगाराची असुरक्षितता का वाढत आहे? तरुणांच्या हातात पदवी, पण नोकरी कुठे? देशातील लाखो तरुण शिक्षण पूर्ण करूनही रोजगाराच्या प्रतिक्षेत आहेत. ‘स्टार्टअप इंडिया’ आणि ‘स्किल इंडिया’ यांसारख्या योजना मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध झाल्या, मात्र त्याचा प्रत्यक्ष फायदा ग्रामीण आणि निम्न मध्यमवर्गीय तरुणांपर्यंत कितपत पोहोचला, हा प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे. स्पर्धा परीक्षा, भरती प्रक्रिया आणि नोकरीच्या संधी या भोवती अनेकदा अनिश्चितता निर्माण होते.



भगवंतजी भगत
मो. 9423788232

काही ठिकाणी परीक्षा प्रक्रियेत त्रुटी, तर काही ठिकाणी भरतीत होणारा विलंब तरुणांमध्ये नैराश्य निर्माण करत आहे. अनेक तरुण आयुष्यातील महत्त्वाचा काळ केवळ परीक्षा, निकाल आणि भरतीच्या प्रतिक्षेत घालवत आहेत. शेतकऱ्यांच्या वेदना आजही कायम, एकीकडे भारत महासत्ता होण्याचे स्वप्न दाखवले जात आहे, तर दुसरीकडे अनेक शेतकरी अजूनही मूलभूत गरजांसाठी संघर्ष करत आहेत. “बैल गेला अन् संसार अडला” हे केवळ शीर्षक नाही, तर ग्रामीण भारताचे कटू वास्तव आहे. कर्जबाजारीपणा, नैसर्गिक आपत्ती, वाढता उत्पादन खर्च, बाजारातील अस्थिरता आणि अपुरा हमीभाव यामुळे शेतकरी मोठ्या अडचणीत आहेत. योजना जाहीर केल्या जातात, मदतीची आश्वासने दिली जातात, परंतु प्रत्यक्ष लाभ मिळण्यात अनेक अडथळे असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येतात. ‘नीट’ होईल, पण विश्वास परत येईल का? “आता परीक्षा नीट होईल” अशी आश्वासने दिली जात आहेत. मात्र प्रश्न केवळ परीक्षेचा नाही, तर विद्यार्थ्यांच्या विश्वासाचा आहे. गेल्या काही वर्षांत विद्यार्थ्यांनी मानसिक तणाव, अनिश्चितता आणि व्यवस्थेतील त्रुटींचा सामना केला आहे. त्यामुळे केवळ आश्वासनांवर नव्हे, तर पारदर्शक आणि प्रभावी अंमलबजावणीवर विश्वास टिकून राहणार आहे. जाहिरातीतील विकास आणि जमिनीवरील वास्तव, सरकारी जाहिरातींमध्ये भारताला प्रगतिशील देश म्हणून सादर केले जाते. परंतु अनेक गावांमध्ये रुग्णालयांमध्ये डॉक्टर नाहीत, शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता आहे, रोजगारासाठी तरुणांचे शहरांकडे स्थलांतर सुरू आहे आणि अनेक कुटुंबे महागाईच्या दबावाखाली जगत आहेत. विकासाची खरी कसोटी केवळ उंच इमारती, मोठे रस्ते किंवा परकीय गुंतवणूक नसते. सामान्य नागरिक अधिक सुरक्षित, समृद्ध आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला का, हे अधिक महत्त्वाचे आहे. प्रश्न विचारणे ही लोकशाहीची ताकद, लोकशाहीत सरकारला प्रश्न विचारणे हा निषेध नसून जबाबदारीचा भाग आहे. सरकारच्या धोरणांवर टीका करणे म्हणजे राष्ट्रविरोध नव्हे. उलट, विधायक टीकेतूनच सुधारणा घडत असतात. आज गरज आहे ती घोषणा आणि वास्तव यातील दरी कमी करण्याची. विकासाचे फायदे शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवण्याची. अन्यथा, लोकांच्या मनातील “विश्वास” कमी होईल आणि “विकास” हा केवळ राजकीय घोषणांमधील शब्द बनून राहील. देशाला प्रचार नव्हे, तर परिणाम हवे आहेत. शब्दांपेक्षा अनुभवातून बदल दिसणे अधिक महत्त्वाचे आहे.●●



# शंकरबाबा पापळकरांच्या व्यथा कोणाला समजणार ?

## मतीमंद मुलांच्या संगोपन-शिक्षणासाठी अठरा वर्षांपर्यंतच मिळते शासकीय अनुदान!



भारत सरकारने पद्मश्री देऊन मतीमंद (गतीमंद), सरकारी शब्द, अनाथ मुलांचे संगोपन करणारा, शेकडो अनाथांचा बाप, मातृत्व जोपासत, ही मुले स्वावलंबी व्हावीत म्हणून धडपडणारा मसीहा शंकरबाबा पापळकर यांचा सन्मान केला आहे. काल या मसीहाचा फोन आला. प्रकृती अस्वस्थ वाटत होती. खोकल्याचा आवाज अस्वस्थ करीत होता. वयाची पंच्याऐंशी गाठली, 'मेरी याद तो नहीं भूले, खुदा?' त्यांचे प्रेमाचे बोल. ‘नहीं बाबा, कैसी बात करते?’ मध्ये-मध्ये त्यांचाच फोन येत असतो. ज्या माणसाने स्वतःच्या हयातीत कबर खोदून ठेवली. एकदा वझर भेटीत बाबा तेथील काही मतीमंद पोरांना विचारत होते, 'क्यूं रे, यह कबर किसलिए?' ते पोरे स्वच्छंद हसत, 'तुम्हारे मरने के बाद इसमें तुम्हे सुलाना है.' मित्रांनो, मृत्यू डोळ्यांसमोर ठेवून आपला सीमित रक्ताच्या नात्यातला संसार विसरून एका विशाल परिवाराचा बाप अनेकांना मातृत्वाच्या पदराने झाकत संगोपन करतो. कोण, कोणाचे, रस्त्यावर भटकणारे, यात्रा-जत्रेच्या गर्दीत आई-बापांनी स्वतःच त्यांच्या भविष्याला कंटाळून भटकवलेले, अशा अनाथांना पोटाशी घेतो, हक्काचे घर देतो. मायेची ऊब देतो. या अनाथांच्या आधारकार्डवर आई-बाप म्हणून शंकरबाबा पापळकर असे नाव प्रदान करतो. किती मोठा हा वारसा. आपला तर लहानसा संसार, आपले वारसदार तुटक्या-फुटक्या भांड्याच्या वाटणीसाठी भांडतात. हा मसीहा तडफडतो आहे या मुलांच्या भविष्यासाठी. फक्त याच नाही तर देशात अशाप्रकारे मतीमंदांचे शिक्षण आणि संगोपन करणाऱ्या निवासी शाळांना, या मुलांच्या वयाच्या अठरा वर्षांपर्यंतच शासकीय अनुदान मिळते. नंतर या मुलांचा आसरा संपतो. पद्मश्री शंकरबाबा पापळकर शासनाला, राजकीय पुढाऱ्यांना भेटीत सांगतात, ‘अरे, या मतीमंद मुलांच्या शेवटपर्यंतच्या संगोपनाची जबाबदारी शासनाने का घेऊ नये? मतीमंद मुलींचे भविष्य काही समाजकंटक वेश्यालयात पोहोचवतात. याचे पुरावे शासनाला माहीत आहेत.’ शंकरबाबा म्हणाले, 'खुदा, मेरा मरना नजदीक है. शासन जाग जाये तो मेरा मरना सुख का होगा. पद्मश्री वापस किया तो लोग मेरी मजाक उड़ायेंगे.' मला त्यांच्या भावना कळत होत्या. पण निवडणुकीसाठी लाडक्या बहिणी, घरकुल योजना, शौचालय योजना, फुकट धान्य, भांडी वाटप, कुकर वाटप या भीकेला लावणाऱ्या योजनांपेक्षा मतीमंदासारख्या जिवंत देवांना शासकीय मदतीचा हात मिळावा हे खरे पुण्यकर्म आहे, समजेल काय कोणाला? धार्मिक स्थळांचे अनुदान थांबवा. भक्त आहेत त्यांना करू द्या धार्मिक स्थळ समृद्ध. पण गरीबाच्या शिक्षणाच्या शाळा समृद्ध व्हाव्यात ही खरी ईश्वरभक्ती कोण समजून घेणार? राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या शब्दात, “है प्रार्थना गुरुदेव से, यह स्वर्गसम संसार हो। अति उच्चतम जीवन बने, परमार्थमय व्यवहार हो॥ ना हम रहे अपने लिये, हमको सभी से गर्ज है गुरुदेव यह आशीष दे, जो सोचने का फर्ज है॥” ●●

जनक्रांतीच्या पाऊलवाटा



ज्ञानेश्वर दुर्गादास रक्षक
मो. 9823966282

# 1950 - सिद्धार्थ कॉलेज विद्यार्थी संसद: हिंदू कोड बिलावर डॉ. बाबासाहेबांचे ऐतिहासिक व्याख्यान

स्वातंत्र्यानंतरचा काळ हा भारताच्या सामाजिक आणि कायदेशीर पुनर्रचनेचा काळ होता. एकीकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान सभेत ‘भारतीय राज्यघटना’ घडवत होते, तर दुसरीकडे ते ‘हिंदू कोड बिल’च्या माध्यमातून हजारो वर्षांच्या स्त्री-गुलामगिरीची साखळी तोडण्याचे महायज्ञ करत होते. 1950 हे वर्ष या लढाईतील सर्वात निर्णायक वर्ष होते. याचवर्षी मुंबईच्या सिद्धार्थ कॉलेजच्या विद्यार्थी संसदेत डॉ. बाबासाहेबांनी हिंदू कोड बिलावर जे विशेष व्याख्यान दिले, ते केवळ कायद्याचे स्पष्टीकरण नव्हते, तर ते समतेचे जाहीरनामाच होते.

**सिद्धार्थ कॉलेज आणि विद्यार्थी संसद :** वैचारिक विचारपीठ - 1946 साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ‘पीपल्स एज्युकेशन सोसायटी’ची स्थापना केली. ‘शिका, संघटित व्हा, संघर्ष करा’ या त्रिसूत्रीनुसार त्यांनी सिद्धार्थ कॉलेज, मुंबई सुरू केले. येथे गरीब, दलित, मागासवर्गीय मुलांना दर्जेदार शिक्षण मिळू लागले. डॉ. बाबासाहेबांचा आग्रह होता की कॉलेज म्हणजे फक्त पदवी घेण्याची जागा नाही, तर ती ‘विचारांची प्रयोगशाळा’ असली पाहिजे. म्हणूनच त्यांनी ‘विद्यार्थी संसद’ हा उपक्रम सुरू केला. या विद्यार्थी संसदेत देशातील ज्वलंत प्रश्नांवर चर्चा होत असे. विद्यार्थीच प्रधानमंत्री, विरोधी पक्षनेते, मंत्री बनून भूमिका मांडत. 1950 च्या सुरुवातीला विद्यार्थी संसदेने ठरवले की यावेळचा विषय ‘हिंदू कोड बिल’ असावा आणि या बिलाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनाच प्रमुख वक्ते म्हणून बोलवावे. डॉ. बाबासाहेबांनी तत्काळ होकार दिला, कारण तरुणांशी थेट संवाद साधणे त्यांना महत्त्वाचे वाटत होते.

**हिंदू कोड बिल :** पार्श्वभूमी काय होती?

ब्रिटिश काळात हिंदूंचे वैयक्तिक कायदे मनुस्मृती, याज्ञवल्क्य स्मृती, मिताक्षरा, दायभाग यावर आधारित होते. या कायद्यांनुसार स्त्रीला संपत्तीचा अधिकार नव्हता, मुलीला वडिलांच्या संपत्तीत हिस्सा नव्हता, विधवेला फक्त ‘पोटगीचा’ हक्क होता, मालकीचा नाही.

**बहुपत्नीत्व कायदेशीर होते :** पुरुष कितीही लग्ने करू शकत होता, पण स्त्रीला घटस्फोटाचा अधिकार नव्हता.

**आंतरजातीय विवाहाला मान्यता नव्हती :** सगोत्र, सप्रवर विवाहावर बंदी.

**दत्तक फक्त मुलगाच :** मुलगी दत्तक घेता येत नसे, कारण ती ‘पिंडदान’ करू शकत नाही, अशी समजूत. हा अन्याय दूर करण्यासाठी 1941 साली ‘राव कमिटी’ नेमली गेली. तिच्या शिफारशींवरून डॉ. बाबासाहेबांनी 1947 साली कायदेमंत्री म्हणून ‘हिंदू कोड बिल’ लोकसभेत मांडले. पण सनातनी, काँग्रेसमधीलच प्रतिगामी नेते आणि हिंदू महासभा यांनी प्रचंड विरोध केला. ‘धर्म बुडाला, संस्कृती रसातळाला गेली’ असा गदारोळ केला. त्यामुळे बिल प्रलंबित पडले.



सुकुशल य ना पाटील
मो. 7499188 523

**1950 चे व्याख्यान :** डॉ. बाबासाहेबांचे ‘व्यावर्तक’ विश्लेषण. सिद्धार्थ कॉलेजच्या सभागृहात विद्यार्थी, प्राध्यापक आणि नागरिक मोठ्या संख्येने जमले होते. डॉ. बाबासाहेब मंचावर आले आणि त्यांनी सुरुवातच एका प्रश्नाने केली, ‘धर्म म्हणजे काय? तो जर माणसाला गुलाम बनवत असेल, तर तो धर्म कसला? तो तर अधर्म आहे.’ पुढे त्यांनी हिंदू कोड बिलातील 7 क्रांतिकारी कलमे सोप्या भाषेत समजावून सांगितली, मुलीला वडिलांच्या संपत्तीत समान वाटा. डॉ. बाबासाहेब म्हणाले, ‘आजपर्यंत मुलगी ही ‘परक्याचे धन’ मानली गेली. लग्न झाले की तिचा बापाच्या घराशी संबंध संपला. पण मुलगा मात्र आयुष्यभर वारस राहतो. हा कोणता न्याय? माझे बिल म्हणते, मुलगा आणि मुलगी दोघेही समान वारस. कारण स्त्री ही माणूस आहे, वस्तू नाही.’



**एकपत्नीत्व कायदा :** ‘पुरुषाला चार लग्ने करण्याचा अधिकार आणि स्त्रीने मात्र नवरा मेल्यावर सती जायचे किंवा जन्मभर वैधव्य भोगायचे - हा धर्म नसून जुलूम आहे. हिंदू कोड बिलाने एकपत्नीत्व सक्तीचे केले. लग्न ही करार आहे, गुलामगिरी नाही.’

**घटस्फोटाचा अधिकार :** ‘जिथे प्रेम नाही, तिथे संसार हा नरक आहे. पूर्वी नवरा बायकोला टाकून देऊ शकत होता, पण बायकोला कोर्टात दाद मागता येत नव्हती. माझे बिल स्त्रीला घटस्फोटाचा, पोटगीचा आणि पुन्हा लग्न करण्याचा हक्क देते.’

**आंतरजातीय विवाहाला मान्यता :** ‘जात ही हिंदू समाजाला लागलेली कीड आहे. जोपर्यंत रोटी-बेटी व्यवहार होत नाही, तोपर्यंत जात नष्ट होणार नाही. म्हणून मी सगोत्र विवाहावरील बंदी उठवली. ब्राह्मणाने महाराची मुलगी केली किंवा महाराने ब्राह्मणाची - तो कायदा गुन्हा मानणार नाही.’

**इ. दत्तकाचा अधिकार :** ‘मुलगा नसेल तर मुलगी दत्तक घेता येईल. कारण ‘मोक्ष’ मुलाच्या हातून मिळत नाही, तर चांगल्या कर्माने मिळतो. ही मनुवादी कल्पना मी कायद्याने मोडीत काढली.’

**विरोधकांना डॉ. बाबासाहेबांचे जाहीर आव्हान :** व्याख्यानात डॉ. बाबासाहेबांचा सूर अत्यंत आक्रमक होता. ते म्हणाले, ‘हिंदू कोड बिलाला विरोध करणारे लोक मला विचारतात, तुम्ही शूद्र, तुम्ही हिंदू धर्मावर कसे कायदा करू शकता?’ मी त्यांना सांगतो, ‘मी या देशाचा कायदेमंत्री आहे. मी संविधान लिहिले. मला मनुस्मृतीपेक्षा भारताचे संविधान मोठे आहे आणि संविधान सांगते, कायद्यासमोर सर्व समान आहेत.’ ‘डॉ. राजेंद्र प्रसाद, पंडित मदन मोहन मालवीय, स्वामी करपात्री हे सर्वजण माझ्या बिलाला ‘धर्मविरोधी’ म्हणतात. मी त्यांना विचारतो – सीता, द्रौपदी, अहिल्या यांची विटंबना झाली तेव्हा तुमचा धर्म कुठे गेला होता? आज जेव्हा मी स्त्रीला माणूस म्हणून जगण्याचा हक्क देतो, तेव्हा धर्म बुडतो का?’ ‘मी सांगतो, जर हिंदू धर्माला टिकायचे असेल, तर त्याने काळानुसार बदलले पाहिजे. जो धर्म बदलत नाही, तो नष्ट होतो. बौद्ध धम्म टिकला कारण त्याने काळाची पावले ओळखली. हिंदू कोड बिल हे हिंदू धर्माला मारण्यासाठी नाही, तर वाचवण्यासाठी आहे.’

**विद्यार्थ्यांना दिलेला संदेश, ‘कायद्याचे रक्षक व्हा’ :** भाषणाच्या शेवटी डॉ. बाबासाहेब विद्यार्थ्यांना उद्देशून म्हणाले, ‘तुम्ही उद्याचे वकील, न्यायाधीश, नेते होणार आहात. लक्षात ठेवा, कायदा हा शस्त्र आहे. तो जर अन्याय करणाऱ्यांच्या हातात गेला, तर तो तलवार होतो. पण तो जर तुमच्या-माझ्यासारख्या पीडितांच्या हातात आला, तर तो ढाल होतो. हिंदू कोड बिल ही तुमची ढाल आहे. तिचे रक्षण करा.’ ‘मी कदाचित या बिलासाठी मंत्रीपदाचा राजीनामा देईन, पण तत्वांचा सौदा करणार नाही. कारण मला शंभर वर्षे जगणाऱ्या मेंढ्यांपेक्षा एक दिवस जगणारा वाघ आवडतो. तुम्ही वाघ बना.’

**राजीनामा पण इतिहास घडला :** 1951 साली नेहरूंनी दबावामुळे हिंदू कोड बिलाचे तुकडे केले. त्यामुळे संतप्त होऊन डॉ. बाबासाहेबांनी 27 सप्टेंबर 1951 रोजी कायदेमंत्रीपदाचा राजीनामा दिला. पण त्यांची लढाई फुकट गेली नाही. 1955-56 साली त्याच बिलाचे चार भाग झाले. हिंदू विवाह कायदा, हिंदू वारसा कायदा, हिंदू अज्ञान व पालकत्व कायदा, हिंदू दत्तक व निर्वाह कायदा. आज करोडो भारतीय स्त्रिया ज्या हक्कांचा उपभोग घेतात, त्या हक्कांचा पाया 1950 च्या त्या व्याख्यानात घातला गेला.

**सिद्धार्थ कॉलेज ते भारतीय संसद :** सिद्धार्थ कॉलेजची विद्यार्थी संसद ही खऱ्या अर्थाने ‘भारतीय संसदेची जननी’ ठरली. कारण ज्या विचारांची पेरणी डॉ. बाबासाहेबांनी 1950 साली 20-22 वर्षांच्या तरुणांच्या मनात केली, त्याच विचारांचे कायदे पुढे भारताची राज्यघटना बनले. आज 2026 साली जेव्हा आपण ‘महिला आरक्षण’, ‘समान नागरी कायदा’ यावर चर्चा करतो, तेव्हा आपण हे विसरता कामा नये की या सर्व चर्चांचा ‘व्यावर्तक’ म्हणजे 1950 चे ते डॉ. बाबासाहेबांचे व्याख्यान होय. डॉ. बाबासाहेबांनी आपल्याला शिकवले – धर्मग्रंथांपेक्षा संविधान मोठे आणि रूढींपेक्षा समता मोठी. हाच खरा प्रबुद्ध भारताचा मार्ग आहे.●●

“ आयुष्यात प्रत्येक गोष्टीमध्ये सौंदर्य शोधा; ते तुम्हाला सुखाची अनुभूती देईल.... ”



# Paper qualification is not real qualification.



# गुणवंत तज्ञ ?

चौकात एक दुकान दिसले. त्यावर फलक लागला होता; इथे पदवी विकत मिळेल. मी पहातच राहिलो तिकडे. लगेच विचार मनात आला; आधीच हे कळले असते तर? थोड्यावेळाने तेथे घोड्यावर बसून एक मोठा नेता आला. त्याने बोर्डकडे नजर टाकली आणि लगेच स्वतःसाठी भरपूर पदव्या खरेदी केल्या. त्याच्याजवळ खूप पैसा होता. त्याला वाटले; आपण आपल्या घोड्यालाही एखादी पदवी घेऊन टाकावी. म्हणून तो दुकानदाराला आपल्या घोड्यासाठी एक पदवी मागू लागला. तेव्हा तो दुकानदार म्हणाला; “माफ करा नेताजी; येथे फक्त गाढवांनाच पदवी मिळते; घोड्यांना नाही.” त्याचे हे उत्तर ऐकून नेताजीला काय वाटले असेल? अशा प्रकारच्या पीएच.डी. पदवीचे प्रबंध आयते टाईप करून देणारी दुकाने प्रत्यक्षात आहेत आणि आता तर पेपर फुटीचे प्रकरण चांगलेच गाजत आहे. साधारणतः चोरी उघडकीस आली की; चोरी झाली असे सर्वांना वाटत असते. पण चोरी उघडकीस आली नाही तरी सुद्धा चोरी होत असते. अशा बाजारात मिळणाऱ्या पदव्या घेतलेले विद्वान व चारित्र्यवान नागरीक उच्च पदावर जाऊन बसलेले आहेत. अवघ्या 20 मार्कांचे नागरिकशास्त्र शिकवणारी ही शिक्षण व्यवस्था भारत देशाचे नागरीक घडवीत आहे. अशा अभ्यासक्रमातून बाहेर पडणारा विद्यार्थी सूज्ञ नागरीक घडत आहे; असा आभास निर्माण केला जातो. पण याकडे वास्तव दृष्टिने विचार करणारांना पद्धतशीरपणे दूर ठेवले जाते. स्वातंत्र्यापुर्वी आणि नंतर स्थापन झालेल्या शिक्षण आयोगांच्या अहवालाचे व इतर शैक्षणिक समस्यांवर वेळोवेळी चिकित्सक अध्ययन व संशोधन करून त्यावरील एकूण अकरा शोध प्रबंध केंद्र सरकारच्या मानव संसाधन मंत्रालयास व राज्य सरकारच्या शिक्षण मंत्रालयास पाठवले. पण त्याचे काय झाले ते कळलेच नाही. पण जेंव्हा अशा बाजारातून खरेदी केलेल्या पदवीधारक गाढवांना शिक्षणतज्ञ म्हणून बाशिंग बांधले जाते; तेव्हा या देशात वेगळे काय घडणार? शैक्षणिक धोरण, अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तकातील निरर्थक व फालतू धडे शिकून तयार केलेल्या गाढवांना घोडे समजून स्पर्धेच्या रेसमध्ये उतरवले जाते. त्यातही चोर मार्गाने काही गाढवांना पुढे आणले जाते; अशा गाढव तज्ञांनी पदावर गेल्यानंतर गाढवपणा केला तर त्यात नवल कसले? आज शासनात व प्रशासनात अशा गाढवांचीच चलती आहे. त्याला तुम्ही हात लावला तर तो तुम्हाला लाथ मारल्याशिवाय रहात नाही. या देशातला सामान्य माणूस यापुढे आपल्या मुलांना डॉक्टर, इंजिनिअर बनवू शकणार नाही. शेतकरी काम करता करता मरत आहे. तो सुद्धा आपल्या मुलाबाळास डॉक्टर, इंजिनिअर कदापी बनवू शकणार नाही; अशी खास तरतूद करून ठेवली आहे. हे सर्व आपण उघड्या डोळ्यांनी पाहतोय आणि मुकाट्याने सहन करतोय. तरी ही घराबाहेर निघत नाही. म्हणून आता मध्यम वर्गियांनी यापुढे असे स्वप्न पाहू नये. भयंकर अशा ढगफुटीने येणारा प्रलय आता या देशात पेपरफुटीने येऊ लागलाय. शेताच्या बांधावर बसून अभ्यास करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलांचं भवितव्य अशा अकाली वादळी पावसाने भिजवून वाहवून नेले जात आहे. सत्तेमधले सत्तापिपासू आणि त्यांना जनतेच्या रक्ताचा पुरवठा करणारे प्रशासनातील कर्मचारी तसेच मटका किंग, दरोडेखोर, खूनी, वाळू माफिया अशा विविध प्रकारच्या गुंडांचा हा देश आता शिक्षण माफियांचा देश म्हणून सुद्धा ओळखला जाईल. कारण आता गाढवांनाच पदवी मिळू लागली आहे. चोरी पकडली गेली म्हणून चोरी झाली; असे नाही तर चोरी पकडली गेली नाही तरी चोरी होतच असते; हे सुद्धा मान्य करायला हवे. चोरी या आधीही होतच होती. फक्त चोर सापडले नव्हते किंवा पकडले गेले नव्हते एवढेच. आधीचे डॉक्टर नाडी, जीभ आणि डोळे पाहून गंभीर आजाराचे त्वरीत निदान करून औषधोपचार सुरू करीत असत. आज समाजात बहूसंख्य डॉक्टर असे आहेत की; पॅथॉलॉजिकल टेस्टचा रिपोर्ट आल्याशिवाय औषधोपचार सुरू करीत नाही. तोपर्यंत पेशंटला सलाईन लावून उपचार चालू असल्याचा देखावा करीत असतात. तोपर्यंत पेशंटचा आजार आणखी गंभीर होत जातो. असे असेल तर डॉक्टरचे काम काय? असा प्रश्न पडतो. अशाही परिस्थितीत कोरोना काळात लाखो पेशंट मेले; तरी पण त्यांनी करोडो कमावले. इंजिनिअर्स सुद्धा असेच आहेत. सर्वत्र सिमेंटचे रस्ते बनवले जात आहेत. लगेच महिना भरात ते पुन्हा फोडले जातात. कित्येक फ्लाय ओव्हर सुद्धा पाच दहा वर्षात तोडले जाताहेत किंवा आपोआप तरी पडताहेत. ही आहे आमच्या देशातील शिक्षणाची अवस्था. आज ट्युशनचे मोठमोठे होर्डिंग, पोस्टर्स, बॅनर्स जागोजागी, शहरोशहरी पहायला मिळतात. शंभर टक्के प्राप्तांकासह शंभर टक्के निकाल! हा काय प्रकार आहे? अरे सगळेच शंभर टक्के घेऊन पास होऊ लागले तर निवड कोणाची होणार? याचा कधी कोण्या उच्च पदवीधारक गाढवांनी आजवर विचार केला आहे काय? इ.स. १९७५ पुर्वी टक्केवारीला फारसे महत्व नव्हते. पास झाले तरी खूप कमावले; असे वाटायचे. १९७३ मध्ये अवघे ४७ टक्के घेऊन एस.एस.सी. उत्तीर्ण झाल्यावर पॉलिटेक्निकला फॉर्म भरला होता. अर्धा एक टक्का कमी पडल्याने प्रवेश निसटला. तरी पॉलिटेक्निक पास करून लगेच नोकरीवर लागलेल्या इंजिनिअर्सच्या ही पुढे मला मजल मारता आली. नवीन शैक्षणिक धोरण, अर्थशास्त्र अध्यापन, शैक्षणिक तंत्रविज्ञान, तत्वज्ञान, मानसशास्त्र, मूल्यमापन, संख्याशास्त्र, रिसर्च मेथडॉलॉजी इत्यादी विषयांचे अध्यापन आणि ते ही केवळ बी.एड. नाही तर विविध विद्यापीठांच्या एम.ए., एम.एड., एम.कॉम., एम.एससी., एल.एल.एम., एम.बी.ए., एम.पी.एड., एम.फिल., आंबेडकर विचारधारा, बुद्धिस्ट स्टडीज, पाली-प्राकृत अशा विविध पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या उच्च शिक्षित प्रौढ आणि वरीष्ठ अभ्यासकांना आव्हानात्मक अध्यापन करतांना जो आनंद मिळत होता; तो शब्दात व्यक्त करणे कठीण. प्रामाणिकपणे अभ्यास करून थर्ड क्लास किंवा सेकंड क्लासमध्ये पास केलेल्या परीक्षा कुठे आणि गुणवत्ता समजून टक्केवारी मिळवलेले शिक्षण कुठे; याची तुलना कशी करता येईल?●●



प्रा. डॉ. भीमराव गोटे
9822235029

## सबला

अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

महाविद्यालयाच्या अंतिम वर्षाच्या शेवटच्या तासांत विद्यार्थीनींना संबोधीत करतांना त्या महिला महाविद्यालयाच्या प्राध्यापिका म्हणाल्या “आता तुम्ही या महाविद्यालयाचा कायमचा निरोप घेणार आहात. म्हणून मी माझ्या अनुभवातून जे काही शिकली ते तुम्हाला सांगते. एक महिला आहात म्हणून तुम्ही स्वतःला अबला समजू नका. सर्वप्रथम स्वावलंबी होण्यासाठी प्रयत्न करा. तुमची स्वतःची मिळकत असावी यावर भर देणे ही काळाची गरज आहे. तुमच्या मेंदूत ज्ञान, काळजात दया, चेहऱ्यावर आत्मविश्वास, ओठांवर हसू, बोलण्यात नम्रता तसेच सत्यता, कृतीत जिद्द आणि आत्म्यात जबादारीची जाणीव असणे गरजेचे आहे. हे सर्व मिळवतांना लोक काय म्हणतील यापेक्षा तुमचे मन काय म्हणते त्याचा विचार करा. कधीकधी काहीजण आपल्याबद्दल नाराजी व्यक्त करतात. पण या नाराजी व्यक्त करणाऱ्या व्यक्तीला आपला विरोधक न समजता हे जाणून घ्या की, कदाचित समोरची व्यक्ती आपल्या प्रती काळजी आहे म्हणून नाराजी प्रकट करू शकतो. जेव्हा तुम्ही उंच भरारी घेण्याचा प्रयत्न करता त्यावेळी तुमचे पंख छाटण्याचा काही प्रवृत्ती विचार करत असतात. तेव्हा आपल्या कृतीतून त्यांना हा संदेश दिला गेला पाहिजे की, कुणी साखळदंडा बंधनात बांधण्याचा प्रयत्न करत असेल तर वेळप्रसंगी मी माझा पाय छाटून लंगडत चालणे पसंत करेन पण गुलामी मला मान्य नाही. सर्वांना सोबत घेऊन चालण्याचे माझे व्रत आहे. मी आपल्या व्यक्तींशी कधीही कोणता सामना करीत नाही. ‘नारी हूँ, नारायण की उत्तराधिकारी हूँ, ना ही अपनों से जीती हूँ, न खुद से हारी हूँ’।●●

# वनविभागाचे दुर्लक्ष आणि जंगल तोडीचे वाढते प्रमाण




याच मुळेच हिंसक पशुंकडून मानवीय हाणी होत आहे. राज्यासह देशात वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण,सीमेंट रोड,अनिर्बंध बांधकाम व काही ठिकाणी धार्मिकतेच्या नावावर मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत आहे आणि ही बाब सरकार उघड्या डोळ्यांनी पाहत आहे तरीही काणावर हात आणि तोंडावर बोट ठेवून बघ्यांच्या भुमिकेत असतांना दिसते.याचाच परिणाम आज हिंसक पशु (वाघ, बिबट्या,अस्वल,) यांची मानवावर व पाळीव प्राण्यांनवर आक्रमकता वाढल्याचे दिसून येते.सरकार दरवर्षी सांगत असते की, हजारो कोटींच्या झाडांचे वृक्षलागवड केली.परंतू प्रत्यक्षात वृक्षलागवड झालीच नसते फक्त ती कागदावरच झाल्याचे दिसून येते.आज सरकारने जंगल कटाई करून औद्योगिकरण, शहरीकरण व सिमेंट रोडचे मोठ्या प्रमाणात जाळे विणले व याचा दुष्परिणाम हळूहळू सर्वत्र जाणवत आहे.अशा परिस्थितीत सरकार झाडांची लागवड कुठे करीत आहे ही बाब समजण्यापलीकडची असल्याचे मला वाटते.सरकारकडून होणारी वृक्षलागवड १०० टक्या पैकी ८० टक्के लागवड फक्त कागदावरच असल्याचे वरील घटनांवरून दिसून येते.आज जंगल तोडीच्या कारणांमुळेच चंद्रपूर जिल्ह्यातील गुंजेवाही परिसरात वाघाच्या हल्यात चार महिलांचा बळी गेल्याचे दिसून येते.सिंदेवाही वनपरिक्षेत्रातील गुंजेवाहीच्या जंगलात दिनांक २२ मे २०२६ ला सकाळी तेंदूपत्ता संकलनासाठी गेलेल्या महिलांवर वाघाने हल्ला करून चौघींना जागीच ठार केले. अशीच घटना मागील वर्षी मे महिन्यातच तेंदूपत्ता संकलनासाठी गेलेल्या तीन महिलांना वाघाने हल्ला करून ठार मारले होते.अशा भयानक घटना सरकारच्या डोळ्यासमोर असुन सुद्धा जंगलतोड थांबलेली नाही व तेंदूपत्ता संकलन करणाऱ्या मजुरांना सरकारने कोणतेही संरक्षण दिलेले नाही हा अत्यंत चिंतेचा विषय आहे.आज जगातील सर्वात जास्त उष्ण शहरांच्या बाबतीत विचार केला तर भारतातील ५० शहरांमध्ये सुर्य आग ओकत आहे ही देशासाठी मोठी धोक्याची घंटा म्हणावी लागेल.कारण दिवसेंदिवस देशातील तापमान मोठ्या प्रमाणात वाढतच आहे.दिल्ली,यूपी, मध्यप्रदेश, महाराष्ट्रात पुढील ७ दिवस तापमानात वाढ होणार असल्याचे सांगितले जाते.त्यामुळे या राज्यातील अनेक शहरे ₹रेड अलर्ट₹ वर आहेत.आज महाराष्ट्रासह देशातील अनेक शहरांचे तापमानाने आपली संपूर्ण सिमा रेषा ओलांडली असून बहुतांश भागात ४५ अंश सेल्सिअस पार झाल्याचे दिसून येते.आज उष्णतेने संपूर्ण विदर्भ होरपळत आहे वर्धा-४७.१, ब्रम्हपुरी -४७.२, नागपूर -४६.६, अमरावती -४६.४, चंद्रपूर -४६.२ आणि इतर शहरांनी तापमानाचा उच्चांक गाठून ४५ अंश सेल्सिअस पार केल्याचे दिसून येते.यामुळेच हिंसक पशुंना पाण्यासाठी वणवण हिंडावे लागत.कारण जंगलातील पाणथड्या सुध्दा आटल्या आहेत. बदलत्या हवामानामुळे, वाढत्या तापमानामुळे आणि जंगलतोडीमुळे जंगलातील पशुपक्षांसाठी असणारा पाणीसाठा संपुष्टात आल्याने वाघ-बिबट्या सारखे हिंसक पशुं गावाकडे किंवा गावांच्या आसपासच्या परिसरात किंवा शहराकडे धाव घेतांना दिसतात. त्यामुळे आज चंद्रपूर जिल्ह्यातील गुंजेवाही परिसरात चार महिलांचा वाघाच्या हल्यात बळी गेल्याचे दिसून येते.मागील पाच वर्षांत चंद्रपूर जिल्ह्यात २०२१-२५ दरम्यान २०० जणांचा वन्यजीव हल्यात मृत्यू झाला आणि चालू वर्षातील पाच महिन्यांतील आकडा १९ वर येवून पोहोचला आहे.अशा प्रकारे आतापर्यंत २१९ जणांचा बळी गेला. परंतु सरकारने यावर ठोस उपाययोजना अजुन पर्यंत केलेली ही शोकांतिका म्हणावी लागेल.अशा गंभीर घटनांवर सरकारने कायमस्वरूपी उपाय योजना अमलात आणावी लागेल तेव्हाच हिंसक पशुंवर नियंत्रण ठेवता येईल.कारण वनविभाग आणि शासनाकडून प्रत्यक्ष उपाययोजनांचा अभाव असल्याने मोठ्या जीवीत हाणी होत आहे याचे जिवंत उदाहरण चंद्रपूरमध्ये दिसून आले हा अत्यंत चिंतेचा व गंभीर विषय आहे.आज जंगल तोडीमुळे हिंसक पशुं मानव व पाळीव प्राण्यांनवर हल्ले करीतच आहेत सोबतच जंगल तोडीचा परिणाम पाण्याची समस्या,अकाल इत्यादी अनेक गोष्टींशी निगडीत असल्याने पुढे चालून याचे गंभीर परिणाम पृथ्वीतलावरील संपूर्ण जीवजंतूंना भोगावे लागतील.कारण वाढत्या तापमान व ढासळती वनसंपदा यामुळेच हिंसक पशुंनी मानवावर आक्रमणाचा पवित्रा घेतल्याचे स्पष्ट दिसून येते.गेल्या अनेक वर्षांपासून चंद्रपूर जिल्ह्यात तेंदूपत्ता संकलन सुरू आहे.या संकलनातून दरवर्षी ३५ हजार कुटुंबांना रोजगार मिळतो. उन्हाळ्यात शेतीची कामे नसल्याने अनेक कुटुंबे जंगलात जाऊन तेंदूपत्ता संकलन करतात व आपला उदरनिर्वाह करतात.ही बाब वनविभाग व सरकारला चांगल्याप्रकारे ग्यात असतांना सुध्दा मजुरांना हिंसक पशुंपासुन सरकार संरक्षण करू शकत नाही ही अत्यंत दुर्दैवी बाब म्हणावी लागेल. महाराष्ट्रात वन्यजीव प्राण्यांच्या हल्याने वाढती जीवीत हाणी अत्यंत चिंताजनक आहे यामध्ये २०२० मध्ये ९३ लोकांचा बळी गेला,२०२१ मध्ये ११८, २०२२ मध्ये १३४,२०२३ मध्ये-१४७,२०२४मध्ये-१६७ आणि २०२५ मे पर्यंत ७२ जणांचा मृत्यू हिंसक पशुमुळे झाला आहे.ही संपूर्ण मानवीय हाणी जंगल कटाईमुळे निर्माण झालेली मोठी समस्या आहे यावर सरकारने ताबडतोब उपाययोजना करणे गरजेचे आहे.वन्य प्राण्यांना (विशेषतः बिबट्यां,वाघ) वन्यप्राण्यांपासुन मानवी हाणी रोखण्यासाठी महाराष्ट्राचे वनमंत्री गणेश नाईक यांनी जंगलात शेळ्या सोडण्याचे म्हटले होते.तरीही वन्यप्राण्यांकडून मोठ्या प्रमाणात मानवी हाणी होतांना आपण पहातो ही अत्यंत गंभीर बाब आहे. हिंसक प्राण्यांपासून होणारी मानवीय हाणी याचे गांभीर्य लक्षात घेऊन सरकारने यावर तातडीने उपाययोजना करावीत.जय हिंद.●●



रमेश लांजेवार
मो.- 9921690779

# गावदेवी मंदिरा बाहेरील महारवीर



रायगड ता. मुरुड मध्ये मोजे : सर्वे या गावच्या पुर्वेकडील बाजुस गाव देवीचे मंदीर आहे. या मंदीरातील मुर्ती पाषाणातील असुन सुबक आहे. या मुर्तीला चार हात असुन हातात शस्त्र धरलेले आहेत डोक्यात मुकुट असुन ते युद्धातील एक कलात्मक शिल्प असावे. या मंदीराच्या बाहेरील प्रांगणात पाषाणातील विविध ६ अशा मूर्त्या असुन गावाचे व तेथील लोकांचे रक्षण करणारे एक स्थान आहे. मंदीराच्या बाहेरील बाजुस एकलाकडी खांब पुरलेले असुन काही आवशेष जमीनी वरती आहे. मनोभावे पुजन दररोज होते या बद्दल महिती घेतली असता ते माहारवीर आहे असे सांगीतले जाते. महारवीर कसा तयार होतो : महार जात ही प्रमाणिक असुन शौर्य लढविणारी होती. राज कर्ती जात असुन वर्णव्यवस्थेतून दूर फेकलेली आणि मिळेल ते काम करून पोट भरणारी जात असे बिरुद या महाराष्ट्रात महारांना लागले होते. कनिष्ट गाव कामगार म्हणून काम करताना चोवीस तास माहारकीचे काम यांना करावे लागे. माहरगडी एक पण तीन - तीन गावांचे काम करावे लागत असे. यंत्रासारखे काम करून खुप थकुन जात असत. कोणाचे काम वेळेवर करता आले नाही म्हणून व अशा बऱ्याच करणांमुळे माहारकीचे गाव कामगार हे उच्चवर्णीयांकडून मारले जायचे. मारल्यानंतर या माहाराचा कोप होईल याचा विचार करून झोप शांत लागत नसे. म्हणून मेलेल्या महाराला पुजण्याची प्रथा चालु केली. हे माहारवीर गावाच्या पुर्वेकडील मैदानात पुजत असत. म्हणून महारवीर हे सर्वे गावात आहे. कनिष्ठ गाव कामगार हे काशिद चिकणी व सर्वे या गावचे काम करित असत आणि काशिद येथे वस्ती होती इसवी 1896 मधील काशिद गावचे बोटखत जंगल खर्डा यांचा अभ्यास केला असता या गावची महारकी प्रमुख झुरिणमाई गणनाक महार या बाईकडे असुन तिने नेमलेला कामगार म्हणून गणनाक बलदेवनाक महार होता हाच तो महारवीर सर्वे गावात आहे. कशिद गावात आजही महार खोंडा, महार कौली व माहारशेत अशी स्थानिक नावे शेतांची आहेत. महार समाज्याची स्मशानभूमी महार मोरी व महारवीर आहे. हा संपूर्ण कालखंड 1870 चा आहे असे अभिलेख पाहता सिद्ध होते. वरील कशिद गावचे कनिष्ट गाव कामगारांचे मुळ वंशज हे स्थलांतरीत असुन ते नवघर या गावी राहतात व त्याचे सहाय्यक कामगार श्री. कदम हे काशिद गावात आहेत. ते मुळ काशिदचे माहारकी वतनदार नाहीत हे कागदपत्रांवरून सिद्ध होते. झुरीण माई गणनाक माहार हि मुळ वतनदार असुन तिचा वंशज सर्वे गावातील माहार वीर आहे आणि तिचे पुढील वंशज श्री. बाबु महादेव शिंदे हे नवघर या गावी राहतात.●●

संतोष बाबु शिंदे
मो. 9860218733

# महिला आरक्षण की राजकीय गणित? एक वास्तव



**महिला आरक्षणाचा खरा हेतू काय आहे? जर सरकारची नीयत खरोखरच स्वच्छ आणि महिला सशक्तीकरणासाठी कटिबद्ध असती, तर २०२३ साली पारित झालेल्या कायद्याची अधिसूचना काढून त्याची तात्काळ अंमलबजावणी केली गेली असती.**

आजच्या घडीला लोकसभेच्या ५४३ जागांमधूनच सुमारे १८० जागा महिलांसाठी राखीव करता आल्या असत्या. मात्र, असे केल्यास अनेक विद्यमान पुरुष खासदारांचे राजकीय अस्तित्व धोक्यात आले असते. मोठ्या नेत्यांच्या खुर्च्या हलल्या असत्या आणि पक्षांतर्गत बंडाळी उभी राहिली असती. त्यामुळेच एक वेगळा मार्ग स्वीकारला जात असल्याचे दिसते, मतदारसंघांची फेररचना करून एकूण जागा ८५० पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव आणि त्यातील सुमारे २८० जागा महिलांसाठी राखीव ठेवण्याची कल्पना. या पद्धतीमुळे विद्यमान नेत्यांनाही जागा मिळतील आणि महिलांनाही आरक्षण दिल्याचे भासवता येईल, म्हणजे दोन्ही बाजूंनी राजकीय फायदा. पण हा खरा महिला सशक्तीकरणाचा मार्ग आहे का, हा प्रश्न उपस्थित होतो. ग्रामपंचायतींच्या स्तरावर आपण “सरपंच पती” ही संकल्पना पाहिली आहे. महिला सरपंच निवडून येतात, पण प्रत्यक्ष कारभार त्यांच्या पतींकडून चालवला जातो. याच पद्धतीचा विस्तार संसदेत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मोठे नेते स्वतःच्या पत्नी, मुलींना तिकीट देतील आणि सत्तेची सूत्रे मात्र स्वतःच्याच हातात ठेवतील. नाव महिलांचे, पण निर्णय पुरुषांचे, हेच का खरे सशक्तीकरण? याशिवाय, महिलांच्या सुरक्षेबाबत आणि न्यायव्यवस्थेबाबत अनेक गंभीर प्रश्न उपस्थित होतात. बिल्किस बानो प्रकरणातील दोषींना दिलेली मोकळीक, महिला कुस्तीपटूंचे दीर्घकाळ चाललेले आंदोलन, तसेच मणिपूरमधील महिलांवर झालेले अत्याचार, या घटनांमुळे “नारी शक्ती”च्या घोषणांमागील वास्तव उघड होते. महिलांविरुद्धचे गुन्हे वाढत असताना केवळ घोषणांनी सशक्तीकरण होणार नाही, हे स्पष्ट आहे. मतदारसंघ फेररचनेमुळे आणखी एक असमतोल निर्माण होण्याची शक्यता आहे. ज्या राज्यांनी लोकसंख्या नियंत्रणात यश मिळवले, जसे तमिळनाडू आणि केरळ. त्यांना तुलनेने कमी जागा मिळतील. उलट, जिथे लोकसंख्या झपाट्याने वाढली. जसे उत्तर प्रदेश आणि बिहार, तिथे जागांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढेल. यामुळे भविष्यात केवळ हिंदी पट्ट्यातील राज्यांवर आधारित सरकारे तयार होण्याची शक्यता वाढेल आणि दक्षिणेकडील राज्यांचा आवाज कमकुवत होईल. आता प्रश्न येतो तो संसदेच्या कार्यक्षमतेचा. सध्याच्या ५४३ खासदारांमध्येच सखोल चर्चा करायला पुरेसा वेळ मिळत नाही, तर ८५० खासदारांमध्ये परिस्थिती काय असेल? संसद ही विचारमंथनाची जागा न राहता जत्रेसारखी गोंधळाची ठिकाण होईल, अशी भीती व्यक्त केली जाते. कायदे जलदगतीने मंजूर होतील, पण त्यामागील सखोल विचार कमी होईल. शेवटी, हे सर्व पाहता एक गोष्ट स्पष्ट होते, हे महिला आरक्षणाचे धोरण नसून २०२९ च्या निवडणुकांसाठी आखलेले राजकीय गणित असू शकते. जागा वाढवणे म्हणजे लोकप्रतिनिधींची फौज उभी करणे, ज्यामुळे आर्थिक भार वाढेल, घराणेशाहीला चालना मिळेल आणि करदात्यांच्या पैशांचा अपव्यय होईल. जनतेला भावनिक मुद्द्यांमध्ये गुंतवून ठेवणे, आकडेवारीने प्रभावित करणे आणि सत्तेचा विस्तार करणे, हीच सध्याची राजकीय दिशा असल्याचे चित्र समोर येते. महिला सशक्तीकरणाचा खरा अर्थ केवळ आरक्षणात नसून, त्यांच्या स्वायत्ततेत, सुरक्षिततेत आणि निर्णयक्षमतेत आहे, हे लक्षात घेणे अधिक गरजेचे आहे.●●



आर. के. जुमळे
मो. 9326450506

# महिला सक्षमीकरणाच्या आद्यप्रवर्तक मातोश्री अहिल्याई

**महाराणी मातोश्री अहिल्याई यांच्या विविधांगी अष्टपैलू अशा भविष्याचा वेध घेण्याच्या क्रांतदर्शी विचाराने आणि अद्वितीय राज्यकारभाराने होळकरशाहीला वेगळाच आयाम लाभला. त्यांनी राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक ही सर्वच परिघ आपल्या अतुलनीय कामगिरीने व्यापून टाकलीत. त्यांच्यातील द्रष्टेपणा अवर्णनीय होता.**

युगप्रवर्तक मातोश्री अहिल्याई यांनी कसलीही जबरदस्ती न करता जन प्रबोधनातून समाज सुधारणा करत समाजात आमुलाग्र परिवर्तन घडवून आणले. समतामूलक समाज निर्माण करतांना स्त्री - पुरुष समानता महत्त्वाची होती. याची जाण ठेवून त्यांनी महिला सक्षमीकरण करण्यासाठी जनमताच्या जोखडातील धर्म, प्रथा, परंपरांच्या अनिष्टतेचा अव्हेर केला. गुलामीच्या साखळदंडांना तोडून स्त्रियांना मुक्त करत स्त्री स्वातंत्र्याचा जयघोष केला. महिलांची सामाजिक न्यायाची बाजू भक्कम केली. महिलांच्या जीवनात सन्मानाचा आणि स्वावलंबनाचा नवा प्रकाश आणला. सदसदविवेकावर आधारित मानवतावादाचा पुरस्कार केला. मातोश्री अहिल्याई यांच्या क्रांतीकारी आचार विचारांचा प्रभाव स्त्रियांवर पडला. या अनुसरणातूनच पुढे महिला सशक्तीकरण घडवून आणण्यास मदत झाली. भारतीय पुरूषप्रधान समाज हा सुरुवातीपासूनच महिलांना दुय्यम लेखत होता. पुरुषांच्या वर्चस्वाला प्राधान्य देत आलेला होता. हे निर्विवाद सत्य कोणीही नाकारू शकत नाही. अलीकडे काही महाशय अहिल्याईच्या केवळ धार्मिक अंगाच्या कार्याचाच हेतुपुरस्सर उदोउदो करून एकांगी इतिहासाची मांडणी करतात. तथाकथित चित्रकार, शिल्पकार व इतिहासकार यांनी अनाठायी बनवलेल्या पिंडधारी, साध्वी, महासती अशा प्रतिमांचा नाहक गुणगौरव करतात. असे करून आपण त्यांच्या अष्टपैलू अशा विविधांगी महान कार्याला कमीपणा आणतो आहोत याचे देखील भान राखले गेले पाहिजे. मातोश्री अहिल्याईंची कारकीर्द ही केवळ एका धार्मिक अंगाने मांडणे हे अतिशय संकुचितपणाचे ठरेल. विविधांगी कार्य करून त्यांच्या व्यक्तिमत्वाची कारकिर्द बहरलेली आहे. त्यामुळे किमान त्या निरनिराळ्या अंगाना स्पर्श करून त्यांचे विविध पैलू मांडणे हे सुद्धा महत्त्वाचे आहे. अलीकडील इतिहासकार, लेखक, साहित्यिक, पुढारी आणि वक्ते हे केवळ मंदिरांची निर्मिती, जिर्णोद्धार पूजापाठ व दानधर्म एवढाच आपल्या सोयीचा तेवढा धार्मिक इतिहास मांडताना दिसतात हे योग्य नाही. मातोश्रींनी त्यांच्या कारकिर्दीत महिलांकरिता लष्करी प्रशिक्षण, रोजगार कौशल्य प्रशिक्षण, पडदा प्रथा बंदी, बालविवाहास विरोध, सती प्रथेला विरोध, विधवेस मुल दत्तक वारसा हक्क प्रदान, विधवा पुनर्विवाहाचे समर्थन, स्त्री - पुरुष समानता, धर्ममार्तंडाचा विरोधाचा प्रतिकार, हुंडाबंदी, दारूबंदी, अस्पृश्यतेचे उच्चाटन, वर्ण व जातीयतेची उच्च निचतेची उतरंड नष्ट करून समतामूलक समाजाची निर्मिती, स्त्रियांच्या दमनाला विरोध, महिला सक्षमीकरणास प्रोत्साहन, आर्थिक पिळवणूकीला विरोध, समाजातील शोषित, वंचित आणि दुर्लक्षित घटकांना न्याय व संरक्षण यांसारख्या कितीतरी बाबींच्या अनुषंगाने समाजसुधारणा केल्यात. त्याकरिता मातोश्री अहिल्याई यांनी सामाजिक परिवर्तन घडवून आणत न्याय हक्क प्रदान केले. जे महिला, समाज, राज्य व केंद्र शासन तथा जगाला आजही मार्गदर्शक, आदर्शवत आणि प्रेरणादायी ठरलेले आहे. लोकमाता अहिल्याईंचे जीवन पृथ्वीतलावरील समस्त मनुष्य प्राणीमात्रांना एक प्रेरणादायी आहे. शौर्य, कर्तृत्व, खंबीरपणा, न्यायप्रियता, धार्मिक सहिष्णुता, धर्मनिरपेक्षता, मानवता, राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव, जलव्यवस्थापन, पर्यावरण संरक्षण, औदार्य, समाज सुधारक, सर्वधर्मसमभाव, मानवतावाद, स्त्री सन्मान, स्त्री सशक्तीकरण, राज्यकारभारातील लोकशाही मूल्ये, वर्तमान संविधानातील नमूद विविध तरतुदीत त्यांच्या कार्याची छाप इत्यादी अपूर्व कार्यकृतीचा संगम त्यांनी घडवून आदर्श राज्यकारभाराची मुहूर्तमेढ रोवली. मातोश्री अहिल्याई यांचे कार्यकर्तृत्व फार विशाल आहे. जगात सर्वप्रथम स्त्रीसबलीकरणाची बीजे त्यांच्याच कार्यकाळात रोवली गेलीत. त्या स्त्री दास्यमुक्तीच्या आद्य प्रवर्तक ठरतात. स्त्री शक्तीचा आणि मातृशक्तीचा जागर करत असताना राष्ट्रमाता अहिल्याईंकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. युगंधरा मातोश्री अहिल्याई यांचे अपूर्व ऐतिहासिक योगदान अविस्मरणीय आहे. त्या माळवा राज्याच्या एक महापराक्रमी महाराणी होत्या. अफाट शौर्य, दृढ आत्मविश्वास, बुद्धिमत्ता, विवेक, शहाणपण आणि पराक्रम याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे एकमेव महाराणी अहिल्याईच. त्या केवळ मुत्सद्दी व निर्भय योद्धाच नव्हत्या तर त्या समाजसुधारक व धर्मसुधारकही होत्या. तत्कालीन सामाजिक रूढी व धार्मिक परंपरा यांच्यातून महिलांवर लादलेली बंधने त्यांनी झुंगारून दिलीत. त्याविरुद्ध आवाज उठवला. कर्मठ धर्ममार्तंडाच्या विरोधात एकाएकी उभ्या ठाकल्यात. त्यांच्यासोबत अभ्यासपूर्ण विवेकी युक्तिवाद केलेत. स्त्रियांची जाचक बंधनातून मुक्तता करत त्यांच्यात स्त्रीत्वाचा स्वाभिमान व अभिमान जागवला. महिलांच्या न्याय हक्कासाठी, स्वातंत्र्यासाठी, मानवी हक्कासाठी, सक्षमीकरणासाठी व सुरक्षिततेसाठी महत्त्वपूर्ण सुधारणा घडवून आणल्यात. त्यांना पुरुषांच्या बरोबरीचे अधिकार बहाल केले. खऱ्या अर्थाने स्त्री पुरुष समानता प्रस्थापित केली. केवळ भारतातच नव्हे तर जगात पहिल्यांदा महिला सशक्तीकरणासाठी कार्य करणाऱ्या राजमाता अहिल्याई या पहिल्या महिला ठरतात. म्हणूनच त्या महिला सक्षमीकरणाच्या आद्य प्रवर्तक गणल्या जातात. केवळ भारतातच नव्हे तर जगाच्या इतिहासात एक सुधारणावादी म्हणून दुर्मिळ कार्य करणाऱ्या कर्मयोगिनी महाराणीवर त्या अनुषंगाने आजही पूर्णतः प्रकाश पडलेला नाही हे ऐतिहासिक दुर्दैवच म्हणावे लागेल. त्यांनी आपल्या राज्यात धार्मिक आणि सामाजिक सहिष्णुता स्थापित केली. महिलांना स्व-विकासाची आणि स्व-स्वातंत्र्याची संधी बहाल केली. 'जगा आणि जगू द्या' हा मूलमंत्र त्यांनी बाळगला. त्यांची कारकीर्द ही महिलांनी अभिमान बाळगावी अशी आहे. त्यांचे महिला सक्षमीकरणात अपूर्व ऐतिहासिक योगदान अविस्मरणीय आहे.●●



होमेश भुजाडे
9422803273



## स्वाभिमानाचे स्मरणशिल्प - १७५

### भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा महाबळेश्वर. जिल्हा सातारा



निसर्गरम्य थंड हवेचे ठिकाण असलेल्या महाबळेश्वर येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धकृती पुतळा हा गजबजलेल्या मार्केट चौकात मुख्य रस्त्यावर नगरपरिषदेने स्थापित केलेला आहे. या पुतळ्याचे आकर्षण म्हणजे पुतळ्याच्या मागे मोठ्या डौलात फडकत असलेला ' निळा ध्वज ' पर्यटकांना आकर्षुन घेतो.

संवाद मित्र, धर्मेंद्र बनसोड
मो नं 98900 94397

# लंडनच्या SOAS विद्यापीठात निवड झालेल्या चेव्हनिंग स्कॉलर प्रशांत रणदिवे यांचा



**नागपूर :** सोलापूर येथील प्रशांत रणदिवे यांची लंडनमधील प्रतिष्ठित SOAS University of London येथे Social Anthropology विषयाच्या उच्च शिक्षणासाठी Chevening Scholar 2026 म्हणून निवड झाल्याबद्दल लहुजी विद्यार्थी संघाच्या वतीने त्यांचा समाज गौरव सत्कार करण्यात आला. यानिमित्त विद्यार्थ्यांसाठी परदेशातील शिक्षणाच्या संधींवर मार्गदर्शनपर व्याख्यानाचेही आयोजन करण्यात आले. प्रशांत रणदिवे यांना ब्रिटन सरकारकडून सुमारे ₹55 लाखांची संपूर्ण चेव्हनिंग शिष्यवृत्ती मंजूर झाली असून त्यामध्ये शिक्षण, निवास आणि इतर आवश्यक खर्चाचा समावेश आहे. सोलापूरसारख्या शहरातून जागतिक दर्जाच्या विद्यापीठापर्यंतचा त्यांचा प्रवास वंचित, ग्रामीण व सर्वसामान्य विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे यावेळी सांगितले.

कार्यक्रमात संघाचे मार्गदर्शक प्रभाकर शिंदे यांच्या हस्ते प्रशांत रणदिवे यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर झालेल्या मार्गदर्शन सत्रात त्यांनी 'परदेशात शिक्षण का व कसे?' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. चेव्हनिंग शिष्यवृत्तीची पात्रता, अर्ज प्रक्रिया, Statement of Purpose (SOP), Letter of Recommendation (LOR), मुलाखतीची तयारी तसेच परदेशातील करिअरच्या संधी याविषयी त्यांनी सविस्तर माहिती दिली.

या कार्यक्रमाला 10 वी, 12 वी, पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणारे विद्यार्थी तसेच पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांची उत्तरे देत प्रशांत रणदिवे यांनी परदेशात शिक्षण घेण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना योग्य नियोजन, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि आत्मविश्वासाच्या बळावर यश मिळविण्याचा संदेश दिला. लहुजी विद्यार्थी संघाच्या वतीने प्रशांत रणदिवे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ईजि रविंद्र खांडेकर, प्रकाश लोखंडे, राजू वानखेडे, कविता ताकतोडे, शारदा वानखेडे, सचिन बावणे आणि नितीन खडसे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन रिंकू ससाने यांनी केले.

# भक्ती संगम समूहातर्फे समविचारींची सहविचार सभा १४ जूनला

**नागपूर :** भक्ती संगम समूह, महाराष्ट्र कमिटीच्या वतीने 'प्रागतिक, पुरोगामी, संवैधानिक समविचारींची सहविचार सभा' रविवार, १४ जून २०२६ रोजी दुपारी ४ वाजता सेवादल महिला महाविद्यालय, सक्करदरा चौक, उमरेड रोड, नागपूर येथे आयोजित करण्यात आली. गेल्या १२ वर्षांपासून 'एक दिवस तरी वारी अनुभवावी' आणि मागील ७ वर्षांपासून 'संविधान समता दिंडी' या उपक्रमांद्वारे वारकरी परंपरेतील समता, बंधुता व मानवतावादी मूल्ये तसेच भारतीय संविधानातील न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेच्या विचारांचा प्रसार करण्यात येत आहे. या उपक्रमांच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या अडचणी, गैरसमज आणि पुढील वाटचालीबाबत मार्गदर्शन व संवाद साधण्यासाठी ही निमंत्रितांची सभा आयोजित करण्यात आली आहे.

सभेला ह.भ.प. शामसुंदर सोन्नर महाराज (परळी वैजनाथ), अविनाश पाटील (धुळे) आणि डॉ. प्रकाश मानेकर (अमरावती) यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या उपक्रमाचे निमंत्रक म्हणून प्रा. प्रभाकर पावडे, संजय शेंडे, ज्ञानेश्वर रक्षक, जगजीतसिंग, सुनिल पाटील, विलास भोंगाडे, बाबा बिडकर, अनुज हुलके, विजय बाभुळकर, मनोज काळे, गौरव आळणे, संजय भुरे, रमेश बिजेकर, प्रकाश ढगे, सुरेंद्र बोराडे, सुधा बामनपल्लीवार, रंजना कोल्हे, मीरा मदनकर, आशू सक्सेना, प्रमोद कावळे, टेमराज माले, राजू बोचरे, सुनिल मगरे, विनोद उलिपवार आणि संजय नरखेडकर यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## महत्वाचे

### क्वालीलॅब इंडस्ट्रीजला ब्रेथ अनालायझर पडताळणीचा परवाना



**नागपूर :** नागपुरातील क्वालीलॅब इंडस्ट्रीज प्रा.लि. या संस्थेला भारत सरकारच्या लीगल मेट्रोलॉजी विभागाकडून ब्रेथ अनालायझर उपकरणांच्या पडताळणी व मुद्रांकनासाठी महाराष्ट्रातील अधिकृत परवाना प्रदान करण्यात आला आहे. शारदा नगर, हुडकेश्वर रोड नागपूर येथे कार्यरत असलेल्या संस्थेने NABL मान्यता व ISO/IEC 17025:2017 या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या निकषांची पूर्तता करून ही मान्यता मिळविली आहे या परवान्यामुळे महाराष्ट्रातील पोलिस विभाग, वाहतूक संस्था, शासकीय विभाग व उद्योगांना राज्यातच अधिकृत आणि तांत्रिक दृष्ट्या प्रमाणित पडताळणी सेवा उपलब्ध होणार आहे. संस्थेचे प्रतिनिधी प्रवीण मांडे यांनी सांगितले की, या मान्यतेमुळे ब्रेथ अनालायझर उपकरणांच्या पडताळणीची प्रक्रिया अधिक वेगवान, सुलभ आणि पारदर्शक होणार असून वेळ व खर्चाची बचत होईल. ग्राहक संरक्षण, मापनातील अचूकता आणि 'ईज ऑफ डुईंग बिझनेस' उपक्रमाला चालना देणारा हा निर्णय असल्याचे मानले जात आहे. अशी माहिती प्रवीण मांडे यांनी दिली आहे.

### मंत्रालयात डॉ. प्रवीण गांगुर्डे यांची प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांच्याशी भेट



**मुंबई :** अनुसूचित जाती आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर विरोध व्यक्त करण्यासाठी डॉ. प्रवीण गांगुर्डे यांनी आज मंत्रालयात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान डॉ. गांगुर्डे यांनी उपवर्गीकरणाला कडाडून विरोध करत अनुसूचित जातींच्या एकजुटीचे प्रतिनिधित्व केले. डॉ. हर्षदीप कांबळे यांनी चर्चेदरम्यान महत्त्वाची माहिती दिली. ते म्हणाले, मुख्य सचिव "प्रिंसिपल सेक्रेटरीष", महाराष्ट्र शासन यांच्या स्तरावर या महिन्यात सुनावणी होणार आहे. त्यानंतर चित्र स्पष्ट होईल." डॉ. प्रवीण गांगुर्डे यांनी या भेटीत उपवर्गीकरणामुळे अनुसूचित जातींमध्ये फूट पडेल आणि सामाजिक न्यायाला हानी पोहोचेल, असे स्पष्ट केले. शासनाने याबाबत सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. ही भेट आरक्षण उपवर्गीकरणाविरोधात सुरू असलेल्या संघर्ष समितीच्या पाठपुराव्याचा भाग म्हणून घेण्यात आली.

### व्हिएतनाममध्ये निर्मला गजभिये 'आंतरराष्ट्रीय जिजामाता पुरस्कार'




**नागपूर :** दि. ०२ जून २०२६ रोजी व्हिएतनामच्या हनोई येथे आयोजित भव्य आंतरराष्ट्रीय समारंभात डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार मंच इंटरनॅशनल या संस्थेला 'आंतरराष्ट्रीय जिजामाता पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. हा प्रतिष्ठेचा पुरस्कार संस्थेच्या वतीने निर्मला गजभिये यांनी स्वीकारला. सामाजिक परिवर्तन, महिला सक्षमीकरण, शिक्षण, मानवता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता, स्वातंत्र्य, बंधुता व सामाजिक न्यायाच्या विचारांचा आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसार करण्यासाठी संस्थेने केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन हा सन्मान प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल मिशन फॉर अ‍ॅडव्हान्स नॉलेज फाउंडेशन या संस्थेच्या वतीने प्रदान करण्यात आला. या सन्मानामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार मंच इंटरनॅशनलच्या कार्याला जागतिक स्तरावर नवी ओळख मिळाली असून, विविध सामाजिक, शैक्षणिक व आंबेडकरी संघटनांकडून संस्थेचे आणि निर्मला गजभिये यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. या गौरवामुळे भारतीय समाजसेवा आणि आंबेडकरी विचारांचा जागतिक स्तरावर होत असलेला प्रभाव अधिक दृढ झाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. आपल्याकडे कार्यक्रमाचे छायाचित्र किंवा उपस्थित मान्यवरांची नावे असल्यास त्यांचाही समावेश करून ही बातमी अधिक आकर्षक करता येईल.

# आशा वर्कर्सना योग्य कामाचा योग्य मोबदला देणार; सकारात्मक निर्णयाचे डीएचओंचे आश्वासन



**नागपूर :** आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियन (CITU), भंडारा जिल्ह्याच्या शिष्टमंडळाने जिल्हा आरोग्य अधिकारी (डीएचओ) डॉ. मेजर नितीन कापसे यांची जिल्हा परिषद कार्यालयात भेट घेऊन विविध प्रलंबित मागण्यांवर सविस्तर चर्चा केली. यावेळी आशा वर्कर्सच्या प्रश्नांबाबत सकारात्मक भूमिका घेत योग्य कामाचा योग्य मोबदला देण्यासाठी आवश्यक निर्णय घेण्याचे आश्वासन डीएचओंनी दिले. बैठकीत आशा योजना (NHM) कायमस्वरूपी करण्याची, आशा व गटप्रवर्तकांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्याची, किमान 30 हजार मासिक वेतन लागू करण्याची, सेवानिवृत्तीनंतर 5 लाख ग्रॅज्युटी व 10 हजार मासिक पेन्शन देण्याची, तसेच सेवानिवृत्तीचे वय 65 वर्षे करण्याची मागणी केली. याशिवाय सहा महिन्यांची पगारी प्रसूती रजा, 15 दिवसांची वार्षिक रजा, राज्य व केंद्र शासनाने नेमून दिलेल्या कामाव्यतिरिक्त इतर कामांचा दबाव टाकणे बंद करणे, जिल्हास्तरावर समन्वय समिती स्थापन करून दर तीन महिन्यांनी बैठक आयोजित करणे, आरोग्यवर्धिनी योजनेचा निधी पूर्णपणे उपलब्ध करून देणे, तसेच हत्तीरोग, कुष्ठरोग, क्षयरोग सर्वेक्षण, स्पुटम संकलन व क्षयरोग रुग्णांना औषध पुरवठा करणाऱ्या आशा वर्कर्सचा 2023 पासूनचा थकीत निधी तातडीने अदा करण्याची मागणी केली.

आबा कार्ड व मातृत्व वंदन योजनेचा प्रलंबित निधी त्वरित उपलब्ध करून देण्यासह, कोणत्याही प्रकारचा विना मोबदला किंवा लेखी आदेशाशिवाय कामाचा दबाव टाकू नये, अशीही मागणी युनियनने केली. या सर्व मुद्द्यांवर सकारात्मक चर्चा झाली. यावेळी डीएचओ डॉ. मेजर नितीन कापसे यांनी 'माझे गाव आरोग्यसंपन्न गाव' या योजनेअंतर्गत शंभर टक्के आशा वर्कर्सनी शंभर टक्के काम पूर्ण करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

या शिष्टमंडळात काँ. राजेंद्र साठे, उषा मेश्राम, सुनंदा बसेशंकर, प्रीती मेश्राम, वैशाली सोमकुवर, श्वेता नागमोते व वनिता तितीरमारे उपस्थित होते.

# स्वरनाद सुर संग्राम २०२६ चा ग्रँड फिनाले उत्साहात

## आशीष कैथवास विजेता; निकिता वासनिक प्रथम उपविजेती, पलक वानखेडे द्वितीय उपविजेती



**नागपूर :** 'कॉस्मिक कल्चरल इव्हेंट्स, नागपूरच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय गायन स्पर्धा 'स्वरनाद सुर संग्राम २०२६' चा भव्य ग्रँड फिनाले नुकताच, ६ जुन २०२६ रोजी, उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. संगीत प्रेमींच्या मोठ्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात स्पर्धकांनी आपल्या सुरेल सादरीकरणाने रसिकांची मने जिंकली. स्पर्धेत उत्कृष्ट गायन कौशल्याचे प्रदर्शन करत आशीष कैथवास यांनी विजेतेपद पटकावले. निकिता वासनिक यांनी प्रथम उपविजेतेपद, तर पलक वानखेडे यांनी द्वितीय उपविजेतेपद मिळविले. सांत्वन पुरस्कार अनघा लोनारे, डॉर्फी जनबंधू, तनिष गजभिये, सचिन शिवपुरे आणि सतीश दामोदरे यांना प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा व आयोजक सारिका खडसे यांच्या मार्गदर्शनात स्पर्धेचे यशस्वीरीत्या आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे पजाई, डॉ. रश्मी तिरपुडे, पूजा ठाकूर राजोरिया, वृंदा ठाकरे, शैलेश शिरभाते, रेणुका काटे तसेच झाडे उपस्थित होते. यावेळी MY FM चे आरजे (RJ) यांनीही उपस्थित राहून स्पर्धकांचे मनोबल वाढविले, तसेच कार्यक्रमाच्या यशाबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले. स्पर्धेचे परीक्षण सुप्रसिद्ध परीक्षक तेजस्विनी खोडतकर आणि कृती बक्सी यांनी केले. स्पर्धकांच्या सूर, ताल, उच्चार, सादरीकरण आणि एकूण कलात्मकतेच्या आधारे निष्पक्षपणे निकाल जाहीर करण्यात आला. ग्रँड फिनालेमध्ये राहुल तुमसरे, स्वाती थोरात, रजनी गेडाम आणि राजेश झाडे यांनी सादर केलेल्या आकर्षक मेडली परफॉर्मन्सने कार्यक्रमात विशेष रंगत आणली. त्यांच्या सुमधुर सादरीकरणाला उपस्थित प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. संचालन संगीता तांबोळी यांनी तर संपूर्ण ध्वनी व्यवस्था स्वरनाद म्युझिकल स्टुडिओ यांनी सांभाळली असून, साऊंड इंजिनिअर रुचिर झाडे यांनी उत्कृष्ट ध्वनी संयोजनाची जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडली. समारोप प्रसंगी आयोजक सारिका खडसे यांनी सर्व स्पर्धक, परीक्षक, प्रमुख पाहुणे, सहकारी आणि उपस्थित रसिकांचे आभार मानले. संगीत क्षेत्रातील नवोदित कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी भविष्यातही अशा दर्जेदार सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन सुरू ठेवण्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# शासकीय मुलींचे बालगृहात महा. अंनिसचा चमत्काराचा भांडाफोड



**नागपूर :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, सावी फाउंडेशन नागपूर आणि महिला बाल कल्याण विभाग, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सर्वांगीण विकास शिबिर मॅजिक विथ लॉजिक' हा उपक्रम उत्साहात पार पडला. योगेश वनकर, प्रियंका बागडे यांच्या पुढाकाराने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दि. ०९ जून रोजी दुपारी दुपारी ३ वाजता आयोजित कार्यक्रमात बालगृहातील सुमारे ५० निवासी मुलींनी सहभाग घेतला. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या चमूने विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन, विवेकवाद, मानवतावाद आणि अंधश्रद्धा निर्मूलन याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी अंनिसचे राज्य कार्यकारिणी सदस्य रामभाऊ डोंगरे यांनी विविध तथाकथित चमत्कारांचे प्रात्यक्षिक सादर केले. रामभाऊ डोंगरे यांनी संवादात्मक पद्धतीने विविध प्रश्नांच्या माध्यमातून अंधश्रद्धेमुळे होणारे सामाजिक व वैयक्तिक नुकसान यावर प्रकाश टाकला. इंजि. कमलाकर सतदेवे यांनी संविधानाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून पुष्पा बौद्ध उपस्थित होते. संचालन सुलोचना खांडेकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन त्रिवेणी गडपायले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वर्षा सहारे, वंदना मेंढे, वर्षा टेंभेकर, रंजना ठवरे, शारदा मोटघरे, अ‍ॅड. विद्या खोब्रागडे, त्रिशला बोदिले, दीप्ती नाईक, शीला डोंगरे, विना कोठारे, शारदा मोटघरे तसेच इतर अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# हलबा समाज महासंघातर्फे विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती व प्राविण्य पारितोषिक योजना जाहीर




**नागपूर :** हलबा समाज महासंघ, दीनदयाल नगर, नागपूर यांच्या वतीने सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी हलबा समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल, गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. तसेच दहावी आणि बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा प्राविण्य पारितोषिक देऊन गौरव करण्यात येणार आहे. समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, त्यांच्यात स्पर्धात्मक वृत्ती विकसित व्हावी आणि आर्थिक अडचणींमुळे शिक्षणात कोणताही अडथळा येऊ नये, या उद्देशाने महासंघाने हा उपक्रम हाती घेतला आहे. महासंघाने 10 वी, 12 वी तसेच पदविका, पदवी आणि इतर उच्च शिक्षण अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या पात्र विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्तीसाठी अर्ज मागविले आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी विहित नमुन्यात अर्ज भरून आवश्यक कागदपत्रांसह सादर करावेत. शिष्यवृत्तीसाठीचे अर्ज महासंघाच्या कार्यालयात उपलब्ध करून देण्यात येत आहेत. याशिवाय सन २०२६ मध्ये दहावी व बारावीच्या परीक्षेत विशेष गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना प्राविण्य पारितोषिक देण्यात येणार आहे. यासाठी दहावी परीक्षेत प्रथम प्रयत्नात ९० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त करणारे विद्यार्थी पात्र राहतील. बारावी परीक्षेसाठी कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना प्रथम प्रयत्नात ७५ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण, तर विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना ८० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त असणे आवश्यक आहे. शिष्यवृत्ती व प्रावीण्य पारितोषिकासाठी अर्ज अध्यक्ष अथवा महासचिव, हलबा समाज महासंघ, सरस्वती ले आऊट, दीनदयाल नगर, नागपूर यांच्या नावे करावेत. अर्जासोबत प्रमाणित गुणपत्रिका तसेच आवश्यक कागदपत्रे जोडणे अनिवार्य राहील. पूर्ण भरलेले अर्ज दि. १५ ऑगस्ट २०२६ पूर्वी महासंघाच्या कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे. विहित नमुन्यातील अर्ज १ जुलै २०२६ पासून महासंघाच्या कार्यालयात विनामूल्य उपलब्ध राहणार आहेत. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी हलबा समाज महासंघाच्या कार्यालयाशी दूरध्वनी क्रमांक ०७१२-२२८९७२७ वर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे. अशी माहिती हलबा समाज महासंघाचे अध्यक्ष प्रा. डॉ. देवराम नंदनवार आणि महासचिव डॉ. रमेश पराते यांनी दिलेल्या पत्रकाद्वारे कळविले आहे.

# अस्मिता बुद्ध विहार, नरेंद्रनगर, येथे बाल धम्मसंस्कार व्यक्तिमत्व



**संवाद मित्र डॉ. सुनिल भगत, नागपूर :** अस्मिता बुद्ध विहार, नरेंद्र नगर, नागपूर येथे बाल धम्म संस्कार व्यक्तिमत्व विकास शिबिरमध्ये चमत्काराचे सादरीकरण आणि वैज्ञानिक दृष्टिकोन डॉ. सुनील भगत, कार्याध्यक्ष, जिल्हा शाखा आणि देवयानी भगत, महिला राज्य सहकार्यवाह, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती यांनी विविध प्रयोगाद्वारे करण्यात आले. डॉ. सुनिल भगत यांनी विविध शगुन अपशकुन आपल्या दैनदिन जीवनात कसे अंधश्रद्धा पसरवत असतात त्याबद्दल माहिती दिली आणि उपस्थित विद्यार्थ्यांना मध्ये जिज्ञासा निर्माण केली आणि खेळीमेळीच्या वातावरणात विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदविला.

देवयानी भगत यांनी जल दीप उद्घाटन करून विद्यार्थ्यांना आश्चर्यचकित केले. दीप प्रज्वलन धाबर्डे यांनी केले.

७ ते१४ जून २०२६ या काळात या बाल धम्म संस्कार व्यक्तिमत्व विकास शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हानिमित्त विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी विविध क्षेत्राचे मान्यवर प्रशिक्षण देण्यासाठी उपस्थित असतात. अस्मिता बौद्ध मंडळचे सदस्य दुबे, वाघमारे आणि इतर मान्यवर या निमित्त उपस्थित होते.

# वनार्टी'कडून स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणासाठी अर्ज प्रक्रिया सुर

## व्हीजेएनटी विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शनाची संधी

**नागपूर :** स्पर्धात्मक परीक्षांमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांना दर्जेदार मार्गदर्शन मिळावे आणि आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही विद्यार्थ्याची स्वप्ने अपूर्ण राहू नयेत, या उद्देशाने वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी) मार्फत २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी विविध स्पर्धा परीक्षांच्या मोफत ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रमासाठी अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचा लाभ राज्यातील विमुक्त जाती (व्हीजे-ए) तसेच भटक्या जमाती (एनटी-बी, एनटी-सी व एनटी-डी) नॉन-क्रिमीलेअर प्रवर्गातील पदवीधर विद्यार्थ्यांना मिळणार असल्याची माहिती 'वनार्टी'चे व्यवस्थापकीय संचालक प्रशांत वावगे यांनी दिली.

या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत युपीएससी, एमपीएससी (ग्रुप बी व सी), महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा (एमईएस), आयबीपीएस पीओ, रेल्वे भरती परीक्षा, एमबीए (सीईटी/कॅट), पोलिस व मिलिटरी भरती, एसएससी-सीजीएल तसेच टीएआयटी या स्पर्धा परीक्षांसाठी मोफत पूर्वतयारी प्रशिक्षण दिले जाणार आहे.

प्रवेशपूर्व चाचणी परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया ८ जूनपासून सुरू झाली असून २५ जून २०२६ ही अर्ज करण्याची अंतिम मुदत आहे. विद्यार्थ्यांची निवड चाळणी परीक्षेतील गुणवत्तेनुसार केली जाणार असून, नामांकित प्रशिक्षण संस्थांमार्फत प्रशिक्षण दिले जाईल. प्रशांत वावगे यांनी सांगितले की, प्रशिक्षणासोबत विद्यार्थ्यांना दरमहा निवास व भोजनासाठी विद्यावेतन तसेच



प्रशिक्षण सुरू करताना एकरकमी आकस्मिक आर्थिक सहाय्य देखील दिले जाणार आहे. या उपक्रमामुळे होतकरू विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची प्रभावी तयारी करण्यासाठी आवश्यक शैक्षणिक व आर्थिक पाठबळ मिळणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दरम्यान, राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण मंत्री तथा 'वनार्टी'चे अध्यक्ष अतुल सावे यांनी अर्ज भरताना आवश्यक कागदपत्रे स्पष्ट, स्वाक्षांकित व स्कॅन करून अपलोड करण्याचे आवाहन केले आहे. अर्जासोबत आधार कार्ड, जात प्रमाणपत्र, वैध नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र, बारावी उत्तीर्ण प्रमाणपत्र, पदवी गुणपत्रिका किंवा प्रमाणपत्र, पदव्युत्तर शिक्षणाची कागदपत्रे तसेच दिव्यांग उमेदवारांसाठी सक्षम प्राधिकाऱ्याचा ४० टक्क्यांपेक्षा अधिक दिव्यांगत्वाचा दाखला सादर करणे आवश्यक आहे.

सर्व कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतरच अर्ज ग्राह्य धरला जाणार आहे. प्रशिक्षणासंदर्भातील निकष, अटी, अर्ज प्रक्रिया आणि इतर सविस्तर माहिती www.vanarti.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, अधिक माहितीसाठी ७८८७८८२०२६ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.



# पीसीई नागपूरमध्ये विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन व तंत्रज्ञान विषयक प्रेरणादायी सत्र

**नागपूर :** प्रियदर्शिनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पीसीई), नागपूर येथे विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील नव्या संधींवर आधारित विशेष प्रेरणादायी सत्राचे आयोजन करण्यात आले. या संवादात्मक सत्रात टीसीएस युरोपच्या BFSI विभागाचे चीफ टेक्नॉलॉजी आर्किटेक्ट अभिजित महांकाळ यांनी विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन, करिअर नियोजन आणि भविष्यातील रोजगाराच्या संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. अभिजित महांकाळ यांनी उद्योगविश्वात वेगाने होत असलेल्या तांत्रिक बदलांचा आढावा घेत एआयच्या युगात विद्यार्थ्यांनी कौशल्यविकास, सातत्याने शिक्षण आणि बदलांशी जुळवून घेण्याची तयारी ठेवणे आवश्यक असल्याचे सांगितले. आपल्या वैयक्तिक करिअर प्रवासातील संघर्ष, अनुभव आणि यशाचे टप्पे विद्यार्थ्यांसमोर मांडत त्यांनी मेहनत, सातत्य आणि योग्य दिशेने प्रयत्न केल्यास यश निश्चित मिळते, असा संदेश दिला.

यावेळी त्यांनी टीसीएसच्या NQT आणि CodeVita यांसारख्या उपक्रमांची माहिती देत विद्यार्थ्यांना या संधींचा लाभ घेण्याचे आवाहन केले. तसेच स्मार्ट इंडिया हॅकाथॉन (SIH) सारख्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी होण्याचे महत्त्व, उद्योगक्षेत्रातील विविध भूमिका, जबाबदाऱ्या आणि उपलब्ध करिअरच्या संधींबाबतही त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, जिज्ञासा आणि सकारात्मक प्रतिसादामुळे संपूर्ण सत्र प्रेरणादायी वातावरणात पार पडले. एआयच्या युगात विद्यार्थ्यांची शिकण्याची आणि सतत प्रगती करण्याची तयारी पाहून समाधान वाटल्याची भावना अभिजित महांकाळ यांनी व्यक्त केली. या उपयुक्त सत्राच्या आयोजनासाठी पीसीईचे प्राचार्य डॉ. श्रीकृष्ण धाले तसेच एलटीजेएसएसचे संचालक डॉ. विवेक ननोटी यांचे विशेष आभार मानण्यात आले. डॉ. सोनी चतुर्वेदी, डॉ. आशिष बी. जिरापूरे, डॉ. एस. गोलाईत आणि इतर प्राध्यापकांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाच्या समारोपावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल अभिजित महांकाळ तसेच टीसीएस AAG टीममधील चेतन खुंकार यांचे आयोजकांच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एआय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648